रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १५७
www.ramprahar.com
रविवार, २४ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नववर्षाचे स्वागत करताना सतर्क राहा!/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
उदय देवरे ठरला 'आमदार श्री २०२३'/८

## नैना प्रकल्पग्रस्तांसाठी पनवेलमध्ये आज भाजपचा निर्धार मेळावा



**पनवेल** : नैना प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने रविवारी (दि. २४) सकाळी १० वाजता पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. भाजप हा सातत्याने भूमिपुत्र, शेतकरी, कष्टकरी, प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, मात्र महाविकास आघाडीचे स्वार्थी आणि निष्क्रिय नेते, पदाधिकारी हेतुपुरस्पर नैना प्रकल्पाबाबत नागरिकांमध्ये गैरसमज पसरवून भडकविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य भूमिपुत्र, शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या समस्या समजून घेत शासनातर्फे त्यावर तोडगा काढण्याकरिता भाजप, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी कटिबद्ध आहेत. त्या अनुषंगाने हा निर्धार मेळावा होणार आहे.





(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी, चिंचवडच्या वॉरियर्सशी संवाद

■ नेते, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती; विजयाचा संकल्प



**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मावळ लोकसभा प्रवास बैठकीच्या निमित्ताने पिंपरी आणि चिंचवड विधानसभा वॉरियर्स बैठकीचे आयोजन रहाटणी येथील थोपटे लॉन्समध्ये शनिवारी (दि.२३) करण्यात आले होते. या वेळी वॉरियर्सशी संवाद साधण्यात आला.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या उद्देशाने विकसित भारत संकल्प यात्रेसह सोशल मीडिया, नमो चषक, बूथ रचना, केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना, सुपर वॉरियर्सची निर्मिती आदी विषयांवर बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह प्रदेश कार्यकारिणी सदस्यांनी तसेच नेत्यांनी उपस्थित वॉरियर्सला मार्गदर्शन केले.

या बैठकीस प्रदेश महासचिव विक्रांत पाटील, उपाध्यक्ष अमर साबळे, बाळाभाऊ भेगडे, सचिव वर्षा डहाळे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, बाळासाहेब पाटील, राजेश पिल्ले, युवा मोर्चाचे प्रदेश महामंत्री अनुप मोरे, चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमाताई खापरे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी महापौर माई ढोरे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, शहर वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, उपाध्यक्ष माऊली थोरात, शहर सरचिटणीस विलास मडीगेरी, नामदेव ढाके, शैलाताई मोळक, संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शितल शिंदे, युवा मोर्च्याचे शहराध्यक्ष तुषार हिंगे, महिला मोर्चाच्या अध्यक्ष सुजाता पालांडे, भाजप कार्यकारिणी सदस्य संतोष कलाटे, किरण ठाकरे, चंद्रकांत नखाते यांच्यासह वॉरियर्स आणि सुपर वॉरियर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपच विजयी होणार आहे, पण तो विजय आणखी दिमाखदार व्हावा यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचा संकल्प या वेळी करण्यात आला.

# हजारोंच्या साक्षीने रामबागचा वर्धापन दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील सुंदर बाग आणि आबालवृद्धांचे आकर्षण असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील रामबाग या उद्यानाचा पहिला वर्धापन दिन सोहळा शुक्रवारी (दि.२२) हजारो उद्यानप्रेमींच्या साक्षीने मोठ्या दिमाखदारपणे साजरा झाला. नयनरम्य वातावरण, आकर्षक विद्युत रोषणाई, उत्तम नियोजन आणि लहानग्यांपासून ज्येष्ठांच्या उपस्थितीने रामबाग नंदनवनाप्रमाणे फुलली होती. त्यातच वीरभूमी एटरटेंमेंट (घणसोलीकर) प्रस्तुत ७० कलाकारांचा संच असलेल्या पारंपरिक आगरी-कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने वातावरणात रंगत आणली.

स्वतःच्या संपत्तीतून लोकांच्या सेवेसाठी उभारलेली रामबाग ही वास्तू न्हावे परिसरातील ग्रामस्थांच्या अभिमानाची ठरली आहे. त्यामुळे ग्रामस्थांकडून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृदय सत्कार करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यात आला. (पान २ वर..)

## लहानग्यांपासून ज्येष्ठांचा सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

### नावात अन् कर्तृत्वातही 'राम' -माजी खासदार संजीव नाईक

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी भाषणात सांगितले की, माणूस जन्माला येतो, परंतु मृत्यूपश्चात किर्ती करून जात असतो आणि त्याचे नाव हे इतिहासात अजरामर होत असते. त्याच रूपाने सच्चा सुपुत्र, कामाचे कर्तृत्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मनोभावे सेवेच्या माध्यमातून रामबागची निर्मिती झाली आहे. त्यांच्या नावात 'राम' आणि कर्तृत्वातही 'राम' आहे.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य कौतुकास्पद -आमदार रविशेठ पाटील

माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जे काम केले आहे ते इतिहासात कोरीव अक्षरात लिहिण्यासारखे आहे. माणूस कितीही मोठा असला तरी मन मोठे असले पाहिजे आणि हे मन मोठे करणारे फक्त एकच या देशात रामशेठ ठाकूर आहेत. त्यांच्यामुळे न्हावेखाडीत रामबागच्या रूपाने कमळ उमलले आणि याचा उपयोग संपूर्ण परिसराला होत आहे.

### जन्मभूमीसाठी काही करू शकलो याचा मोठा आनंद -लोकनेते रामशेठ ठाकूर

माझ्या आयुष्यात सर्वांत महत्त्वाचे कार्य शाळा-महाविद्यालयांची निर्मिती, अनेक शाळांना मदत हे असले तरी त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे कार्य जिथे आपला जन्म झाला, जन्मदाती आई जशी असते तशी ही जन्मभूमी मला प्यारी आहे आणि तिच्यासाठी काही करू शकलो याचा मोठा आनंद आहे. रामबागला भेट देणाऱ्यांना समाधान व त्यांच्या चेहऱ्यावर मनमुराद आनंद दिसतो. यात मलाही आनंद होतो, असे लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले.

*एक राजा होता. त्याने वस्तूला हात लावल्यावर सोने व्हायचे. आपण ते कुणी बघितले नाही, पण एक खाजण होते. त्या जमिनीला हात लावल्यावर त्याचे सोने होते हे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रामबागच्या निर्मितीतून दाखवले आहे आणि हे सर्व त्यांनी लोकांकरिता केले आहे, स्वतःकरिता नाही. मुंबईमध्येदेखील असा सुंदर प्रकल्प नाही, जो रामशेठ ठाकूर यांनी उभारला आहे. हा प्रकल्प लोकांसाठी आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हणण्याची परंपरा महाराष्ट्राला आहे. त्यामुळे मी रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी पुढच्या पिढीला सुंदर वास्तू आणि मोकळ्या हवेत आणण्याचे काम केले आहे. तुमचे काम चांगले आहे व ते तुम्ही लोकांसाठी करीत राहता. म्हणून पवारसाहेब बोलतात, आम्हाला कुणाला जमत नाही ते रामशेठना कसे जमते. त्यामुळे कृपा करून टीकाकारांनी चांगल्या गोष्टीत राजकारण आणू नये.* ***-मधुकर भावे,*** *ज्येष्ठ पत्रकार*

# मराठा आरक्षण : सुप्रीम कोर्टाने क्युरेटिव्ह पिटीशन स्वीकारली




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणासंदर्भातील क्युरेटिव्ह पिटीशन (दुरूस्ती याचिका) सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारली आहे. त्यामुळे लवकरच आरक्षणाच्या संबंधाने सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी व्यक्त केली आहे.

राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये दिलेले आरक्षण मुंबई उच्च न्यायालयात टिकले, पण सर्वोच्च न्यायालयाने २०२१मध्ये हे आरक्षण रद्द केले होते. त्यामुळे सरकारतर्फे सुप्रीम कोर्टात क्युरेटिव्ह पिटीशन दाखल करण्यात आलेली होती. ती कोर्टाने स्वीकारली असल्याचा दावा विनोद पाटील यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, २४ जानेवारी रोजी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीशांसह चार न्यायाधीशांसमोर सुनावणी होईल. पिटीशन स्वीकारल्याने आशा निर्माण झाली आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने क्युरेटिव्ह पिटिशन स्वीकारल्याने मराठा आरक्षणाबाबत हा मोठा दिलासा मानला जात आहे. या याचिकेवर खुल्या कोर्टात सुनावणी होण्याची शक्यता असून आता २४ जानेवारी रोजी पुढील सुनावणीत नेमके काय होणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.





**खालापूर : शनिवार, रविवार वीकेण्ड आणि जोडून ख्रिसमस अशा सलग सुट्ट्या आल्याने मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर शनिवारी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा सुरू होती. त्यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीही झाल्याचे पहावयास मिळाले.** **(वृत्त पान ५ वर..)**

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ७ जानेवारीला कर्जतमध्ये

**कर्जत : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ७ जानेवारी रोजी शासकीय कार्यक्रमासाठी कर्जत येथे येणार आहेत. या वेळी कर्जत शहरातील विकासकामांचे लोकार्पण आणि काही विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या वेळी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी केले आहे.

या संदर्भात कर्जत येथील शिवसेना पक्ष कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, युवासेनेचे जिल्हा अधिकारी जयेंद्र देशमुख, शिवसेना तालुकाप्रमुख संभाजी जगताप, कर्जत विधानसभा मतदारसंघ संघटक शिवराम बदे, संपर्कप्रमुख पंकज पाटील, उपजिल्हा संघटक सुरेखा शितोळे, तालुका सचिव रमेश मते, विभागप्रमुख भालचंद्र घोडविंदे, सुनील ठाकूर, माजी उपसभापती मनोहर थोरवे, प्रदीप सुर्वे, महिला तालुका संघटक रेश्मा म्हात्रे आदी उपस्थित होते.

# नाताळनिमित्त बाजारपेठा सजल्या

**पनवेल : वार्ताहर**

ख्रिसमस अर्थात नाताळ सण येत्या सोमवारी (दि.२५) आहे. त्यामुळे पनवेल बाजारपेठही विविध भेटवस्तू, खेळणी, कपडे आणि मिठाईने सजली आहे. यामध्ये ख्रिसमस ट्री सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

ख्रिश्चन धर्मियांचा सर्वांत मोठा व महत्त्वाचा सण म्हणून नाताळ ओळखला जातो. यानिमित्ताने बाजारपेठेत विविध प्रकारच्या वस्तू उपलब्ध आहेत. यात भेटवस्तू, कपडे, खेळणी, विद्युत उपकरणे, दागिने इत्यादींचा समावेश आहे. यंदा नाताळ खरेदीची धूम १५ डिसेंबरपासून सुरू झाली. तेव्हापासून बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे. बाजारातील दुकाने नाताळच्या सजावटीने सजलेली आहेत. दुकानदार आपल्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नाताळच्या थीमवर विविध ऑफर आणि प्रमोशन्स देत आहेत.

नाताळदरम्यान ख्रिस्ती बांधवांमध्ये महत्त्वाचे मानले जाणारे ख्रिसमस ट्री आकारानुसार २५० ते १५०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. यंदा ख्रिसमस ट्रीसह अन्य वस्तूंच्या किमती वाढल्या असल्या तरी त्या आवर्जून खरेदी केल्या जात असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले.




# नववर्षाचे स्वागत करताना सतर्क राहा!

## केंद्रीय आरोग्यमंत्री भारती पवार यांचे नागरिकांना आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

सध्या संपूर्ण देशभरात नववर्षाच्या स्वागताची तयारी सुरू आहे, पण दुसरीकडे मागील काही वर्षांपासून धास्ती असलेल्या कोरोनादेखील त्याचे डोके वर काढतोय. सध्या देशात जेएन१ व्हेरियंटमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झालंय. या पार्श्वभूमीवर अयोध्येसह देशभरात आरोग्य यंत्रणेला सतर्कतेचा इशारा देण्यात आल्याची माहिती केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांनी एका वृत्तवाहिनीला दिली.



देशात कोरोनाचा नवा व्हेरियंट धुमाकूळ घालतोय. केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र गोवा या राज्यांमध्ये प्रादूर्भाव वाढत असल्याने या राज्यांमध्ये विशेष खबरदारी घेतली जात आहे, मात्र सध्या सुट्टीचे दिवस असल्याने नागरिक पर्यटनासाठी बाहेर पडत असल्याने खबरदारीच्या सूचना करण्यात आल्या.

ज्येष्ठ नागरिक, इतर व्याधींनी त्रस्त असणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे तसेच गर्दीत जाणे टाळावे, मास्कचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. केरळमध्ये आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने तिथे जास्त प्रादूर्भाव वाढल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोरोना नियमांचे पालन करण्याबरोबरच जिनोम सिक्वेन्सिंग केले जात असून चाचण्या वाढवण्यात आल्या आहेत.

### नवीन व्हेरियंटने वाढवली चिंता

***कोरोना जेएन १ या नवीन व्हेरियंटमुळे चिंता वाढली आहे. या व्हेरियंटमुळे कोविड रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे मानले जाते आहे. नवीन व्हेरियंट कोविड १९ विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरियंटचा सब-व्हेरियंच आहे. जेएन१ व्हेरियंटचा पहिला रुग्ण २५ ऑगस्ट २०२३ रोजी आढळला होता. केरळमध्ये कोरोनाचा नवीन सब-व्हेरियंट आढळून आला. भारतात दिवसेंदिवस कोरोनाचा वाढता आलेख पाहायला मिळत असून रुग्णांची संख्या २९००च्या पुढे गेली असून सहा कोरोनाबाधितांचा मृत्यू झाल्याचीही नोंद झाली आहे. यामुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे.***

# व्हेलच्या उलटीची विक्री करण्यापूर्वी दोघे पोलिसांच्या जाळ्यात

**ठाणे : प्रतिनिधी**

व्हेल माशाच्या उलटीची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन जणांना ठाण्यात श्रीनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. या दोघांकडून ताब्यात घेतलेली दगडसदृश वस्तू ही व्हेल माशाची उलटी असून ही उलटी मध्यस्थीच्या मदतीने तीन कोटींना विकण्यासाठी आरोपी ठाण्यात आले होते. या प्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना अटक केली आहे.

**तीन कोटींचा ऐवज जप्त**

ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरातील रोड क्रमांक १६ येथे दोन जण व्हेल माशाची उलटीच्या विक्रीसाठी येणार असल्याची माहिती श्रीनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराज बेंद्रे यांना मिळाली होती. त्यानुसार बेंद्रे यांच्या पथकाने सापळा रचून मुझमील सुभेदार (४५, रा. श्रीवर्धन, रायगड) आणि शहजाद कादरी (४६, रा. वरवटणे, ता. म्हसळा, रायगड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील बॅगमध्ये पिवळसर तांबट रंगाचा वेगवेगळ्या आकाराचा पदार्थ सापडला.


पोलिसांच्या चौकशीत हा पदार्थ व्हेल माशाची उलटी असल्याचे समोर आले. ही उलटी मध्यस्थीच्या मदतीने तीन कोटींना विकणार होतो, अशी कबुली दोघांनी दिली. पोलिसांनी दोघांच्या ताब्यातून व्हेल माशाच्या उलटीसह दोन मोबाईल फोन जप्त केले. या दोघांना न्यायालयाने २६ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

तस्करांकडून ताब्यात घेतलेली व्हेल माशाची उलटी खरी आहे की, बनावट याचा छडा लावण्यासाठी ती प्रयोगशाळेत पाठवली जाणार आहे. याठिकाणी तिच्यावर प्रक्रिया करून ही उलटी खरी आहे की, बनावट याबाबत माहिती घेतली जाणार आहे. मुख्यतः परफ्युम, उच्च दर्जाचे अत्तर बनवण्यासाठी या उलटीचा वापर होतो. ही उलटी आरोपींनी श्रीवर्धनवरून येथून आणल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले असून या अनुषंगाने ठाणे पोलीस श्रीवर्धन येथेही तपास करणार आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात एनसीसी दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे नॅशनल कॅडेटस् कोर्स (एनसीसी) विभागातर्फे गुरुवारी (दि. २१) वार्षिक एनसीसी दिन साजरा केला.



या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून झाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे कर्नल नवीन शर्मा आणि संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांची उपस्थिती लाभली.

एकूण ९० (एसडी कॅडेट्स ४१, एसडब्लू कॅडेट्स ४९), ए. एन. ओ. लेफ्टनंट प्रा. निलिमा तिदार आणि सीटीओ. जितेंद्र पावरा यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाध्ये विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. त्यामध्ये केन ड्रिल, रायफल ड्रिल आणि बँड स्क्वाड यांसारख्या विविध कवायतींचा समावेश होता. त्याचबरोबर रूम क्लिअरन्स आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यामध्ये सर्व कॅडेट्सनी सहभाग घेतला.

सर्वोत्कृष्ट कवायती आणि सर्वोत्कृष्ट कमांड या कामगिरीबद्दल कॅडेट्सचा सत्कार करण्यात आला. एनसीसी विद्यार्थ्यांनी विविध प्रदर्शने भरविली. कार्यक्रमाच्या शेवटी सहयोगी अधिकारी लेफ्टनंट प्रा. निलिमा तिदार यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि असोसिएट एनसीसी ऑफिसर मेजर प्रो. (डॉ.) उद्धव भंडारे यांनी कौतुक केले.

# सावित्रीबाई फुले स्मारकाच्या जागेची उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केली पाहणी

**पुणे : प्रतिनिधी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या स्थळाचे महत्त्व लक्षात घेता मुलींना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यातून शिक्षणाची प्रेरणा मिळेल असे स्मारक भिडेवाडा येथे उभारण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.



राष्ट्रीय स्मारक भिडेवाडा, महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या जागेची पाहणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्या वेळी ते बोलत होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, शहराध्यक्ष दीपक मानकर आदी उपस्थित होते.

महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासंदर्भात अजित पवार म्हणाले की, अडीच एकर क्षेत्रावर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक उभारण्यात आले आहे. याठिकाणी महिलांना प्रशिक्षण देण्याचे काम सुरू आहे. महात्मा फुले वाडा १९९३मध्ये उभारण्यात आला आहे. दोन्ही भाग एकत्र करून विस्तृत स्वरुपाचे जागतिक दर्जाचे स्मारक उभारण्याचा शासनाचा मनोदय आहे. त्यासाठी काही कुटुंबांना स्थलांतरीत करावे लागेल. रहिवाशांना आवश्यक सुविधा आणि पर्यायी जागा देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. राज्य शासन आणि महानगरपालिका मिळून पुण्याच्या मध्यवर्ती भागात एकूण पाऊणेचार एकर क्षेत्रात जागतिक दर्जाचे स्मारक उभारेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड चिटणीसपदी नरेश कोकरे यांची फेरनियुक्ती

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा कार्यकारिणी २०२३-२०२६ प्रथम टप्प्यातील संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. रोहा तालुक्यातील करविणे गावचे युवा नेते यांची भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा चिटणीसपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे.



रायगड लोकसभा प्रमुख सतीश धारप, जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, जिल्हा सरचिटणीस प्रशांत शिंदे, रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांचे मार्गदर्शन लाभले आहे. जिल्ह्यात अनेक खेड्यापाड्यातील वाडीमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबविल्या असून ते सामान्य जनतेच्या घराघरात पोहचले आहेत.

दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे पाटील व पक्षश्रेष्ठींनी माझी दक्षिण रायगड युवा मोर्चा चिटणीसपदी नियुक्ती केली आहे त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानत आहे. पक्षवाढीसाठी मी प्रयत्न करणार असून माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवणार असल्याचे नरेश कोकरे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी बुद्धीचा वापर योग्य ठिकाणी करा -विक्रम वैद्य

**चौक : प्रतिनिधी**

बुद्धी म्हणजे वस्तू, व्यक्ती, प्रसंग व माहिती समजून घेण्याची, ती लक्षात ठेवण्याची क्षमता, तसेच काय चांगले व काय वाईट हे ठरविण्याची क्षमता असल्याने तिचा वापर करून स्वतःचे अस्तित्व निर्माण करा. त्यामुळे तुम्ही जगात स्वाभिमानाने जगाल, असे प्रतिपादन चार्टड अकाऊन्टंट विक्रम वैद्य यांनी केले.



चौक येथील विद्या प्रसारणी सभा शिक्षण संस्थेच्या सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक यांचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ झाला. त्या वेळी विक्रम वैद्य बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष विधीतज्ञ अविनाश देशमुख होते. विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्या विद्यार्थ्यांनी स्वहस्ते गानकोकिळा, भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जीवनावर आधारित तयार केलेल्या अल्बमचे अनावरण विक्रम वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. विक्रम वैद्य यांनी शिक्षण संस्थेला एक लाख रुपयांचा धनादेश देणगी दिला.

यावर्षी आदर्श विद्यार्थी म्हणून सागर पवार तर आदर्श विद्यार्थीनी म्हणून दानिया अंसारी यांची निवड झाल्याने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास चार्टड अकाऊंटंट सुरेश खेडकर, संस्थेच्या कार्याध्यक्ष शोभा देशमुख, मुख्याध्यापक बादशहा भोमले, शिक्षक प्रतिनिधी देवानंद कांबळे, योगेंद्र शहा, शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरून

## हजारोंच्या साक्षीने रामबागचा वर्धापन दिन साजरा

या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, डेल्टाचे नितीन पटेल, माजी जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी उपमहापौर सीता पाटील, प्रभाकर बहिरा, विश्वनाथ कोळी, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, अरुण ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबिय, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी तसेच पदाधिकारी उपस्थित होते. श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर आणि रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, स्वप्नील ठाकूर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी भाषणात सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ज्ञानदानाचे काम केले आहे. वाशीला माझी शाळा आणि त्या शाळेत त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. ते भाग्य आम्हाला मिळाले आणि मी त्यांचे काम कर्तृत्व स्वतः बघितले आहे. त्यांचे कर्तृत्व इतके झाले की, थेट दिल्लीत खासदार म्हणून गेले. काम करण्याचे धाडस लागते, तशी हिंमत लागते आणि तेवढे दातृत्वपण लागते. या ठिकाणी त्यांनी जी सेवा केली आहे त्याबद्दल आम्ही सर्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे ऋणी आहोत. आम्ही अशाच प्रकारचे एक सुंदर मंदिर बनवले होते, पण तांत्रिक अडचणीमुळे सुंदर वास्तूला सर्वच लोकं मुकली. त्यामुळे लोकांसाठी बनवलेली रामबाग ही सुंदर वास्तू अधिक फुलण्यासाठी लोकांनीही प्रयत्नशील राहिले पाहिजे. हा सोहळा यापुढे यापेक्षाही मोठा झाला पाहिजे.

मुंबई जवळ आली आहे. त्यामुळे तेथील लोकं येथे येणार आहेत. आज गुगलवर क्लिक केले तर या रामबाग या ठिकाणी येत असते आणि ही आपल्या सर्वांची, या परिसराची ओळख आहे, असे नमूद करतानाच ग्रामपंचायतीने रामबाग नावाचा ठराव करावा असे सूचित करून या ठिकाणी येण्याकरिता नवी मुंबई महापालिका परिवहन बससेवा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही डॉ.संजीव नाईक यांनी दिली तसेच काम करणाऱ्यांवर नेहमी टीका होत असते, पण तुम्ही टिकेने ध्येयापासून विचलित न होता जनतेसाठी सदैव काम करीत राहता हे तुमचे मोठेपण आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हटले की, देवाच्या कृपेमुळेच या जागेवर आपल्या सर्वांना चालता येत आहे. ग्रामस्थांच्या आग्रहास्तव या मंदिराला रस्ता झाला आणि मधल्या कालावधीमध्ये काही डेब्रिज विकणाऱ्यांनी या ठिकाणी भराव केला. या ठिकाणी मंदिर परिसरातील उधाणाचे पाणी नियमित नाही, पण पौर्णिमा, अमावस्येच्या वेळी यायचे. देवाने प्रेरणा दिली म्हणून या ठिकाणी सुंदर मैदान, तलाव, बाग झालेली आहे. टीका करणारे करीत राहतील, पण येथे भेट देणारी सगळी लोकं हे चांगले आहे की वाईट हे सांगतील. सिडकोने या बागेच्या देखभाल-दुरुस्तीचे काम करायला पाहिजे होते. या संदर्भात आमदार महेश बालदी यांनी लेखी पत्र दिले आहे. ही बाग आमच्याकरिता बनवलेली नाही ही सिडकोच्या नावावर आहे आणि त्यांच्याच नावावर राहणार आहे. सिडकोची इच्छा असेल, तर ही बाग सिडकोने विकसित करावी करावी. ही बाग माझी नाही, माझ्या मालकीचा उल्लेख नाही. रामबाग हे नाव मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर यांनी दिलेले आहे. साहजिकच जो काम करतो त्याचे नाव लावले जाते, तशा प्रकारे नाव देण्यात आले, पण बाकी त्याच्यामध्ये एक टक्काही मालकी हक्क नाही आणि ही रामबाग या गावाचे लौकिक वाढवणारी असून भविष्यकाळामध्ये प्रेक्षणीय स्थळ करण्याच्या दृष्टीने या रामबागचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन अधिक सुंदर करावी. जर सिडको तयार होत नसेल तर न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी सांगितले आहे की, ग्रामपंचायतीच्या ताब्यात द्या, आम्ही बाग सांभाळतो. त्या दृष्टीने एखाद्या सामाजिक संस्थेच्या ताब्यात देऊन ती देखभाल-दुरुस्ती व विकसित करेल. ग्रामपंचायत स्वतः करेल किंवा ती संस्था करून घेईल, पण सिडकोवर बोजा टाकणार नाही. त्या अनुषंगाने ही प्रॉपर्टी न्हावे ग्रामपंचायतीची आहे. ती त्यांच्याच ताब्यात राहील. माझ्याकडे जे काही आहे ते मी सर्व द्यायला तयार आहे. आयुष्याच्या सुरुवातीला काबाडकष्ट करून जीवन जगलो. त्यामुळे मला पैशाची गरज नाही, देवाने भरपूर दिले आहे. तुम्ही लोकं येथे येतात व आनंदित होऊन जाता त्यातच आपले समाधान आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले.

माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वडील मचव्यावर काम करायचे. माझा आणि त्यांचा परिचय होता. मुंबईला असताना त्यांच्याशी गप्पागोष्टी व्हायच्या. चांगला स्वभाव, चांगले व्यक्तिमत्व आणि बोलण्यात कुठलेही अपशब्द नाही असे ते होते. त्यांच्या पोटी हे नररत्न जन्मले. या नररत्नाने फक्त या परिसरालाच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राला सुगंध दिला. रामशेठना मी प्रत्यक्ष जेव्हा बघितले तेव्हा खरा माणुसकीने ओतप्रोत व्यक्तिमत्व अधोरेखित झाले. मुंबई दहा मिनिटांवर आली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात रामबागमुळे या विभागाचे नाव मोठे होणार आहे. परमेश्वररूपी माणूस जन्माला आला म्हणून या न्हावाखाडीचे नाव जगात पसरले असून त्यांनी कोट्यवधी रुपयांची वास्तू जनतेला निर्माण करून दिली आहे आणि या वास्तूचा फायदा परिसराला होत आहे. लोकांसाठी काम करण्याचे काळीज लागते आणि ते मोठे काळीज त्यांच्याकडे आहे, सत्कार्यरूपी कार्य त्यांचे आहे. त्यामुळे ते दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

# शिपिंग क्षेत्रातील तरुणांच्या फसवणुकीबाबत निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईमध्ये शिपिंग क्षेत्रात तरुणांचा होत असलेल्या आर्थिक फसवणुकीबाबत भाजप कामगार मोर्चा प्रदेश सरचिटणीस संजय पवार यांनी अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) दीपक सकोरे यांना निवेदन दिले आहे.



या निवेदनात संजय पवार यांनी म्हटले आहे की, नवी मुंबई हे २१व्या शतकातील शहर असून व्यापार वृद्धी व आधुनिकीकरण आणि दिवसेंदिवस वाढत जाणारे आर्थिक क्षेत्र यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सीबीडी बेलापूरमध्ये शिपिंगची ट्रेनिंग देणारे काही कॉलेजेसदेखील अनेक मुलांना चांगली ट्रेनिंग देऊन या ठिकाणी शिक्षित करतात, परंतु या शिपिंगच्या क्षेत्रात नवी मुंबईमध्ये तरुणांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याच्या अनेक तक्रारी आम्हला प्राप्त होत असतात.

याबाबत त्वरीत कारवाई करून फसवणूक करणाऱ्या कंपनीवर गुन्हे दाखल करून त्या तातडीने बंद कराव्यात, अशी मागणी केली आहे.

**दुखवटा**

## अल्पेश गायकवाड



**पाली** : बौद्धजन पंचायत समिती नागोठणे विभाग शाखा क्र. ३चे सदस्य अशोक गायकवाड यांचा ज्येष्ठ पुत्र अल्पेश अशोक गायकवाड यांचे शुक्रवारी (दि. २२) रात्री वयाच्या ३३व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने गायकवाड कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अल्पेश गायकवाड हे आंबेडकरी बहुजन चळवळीतील सक्रिय आणि निष्ठावान कार्यकर्ते होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण, नातेवाईक असा मोठा परिवार आहे. त्यांचा पुण्यानुमोदन आणि शोकसभा कार्यक्रम ३ जानेवारी २०२४ रोजी रमाई नगर येथील राहत्या घरी होणार आहे.

# नैना क्षेत्रात मेट्रो सुरू करणाबाबत चाचपणी

## सिडकोकडून आराखड्यासाठी हालचाली; अभ्यासगटाची स्थापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई विमानतळ प्रकल्पास लागूनच तिसरी मुंबई म्हणून विकसित केल्या जात असलेल्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रात (नैना) सिडको प्रशासनाने अंतर्गत मेट्रो प्रकल्पाच्या उभारणीसाठी सूचिबद्ध असा आराखडा तयार करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.




नेरूळ–उरण मार्गावरील तरघर रेल्वेस्थानक ते आंबिवली असा १९ किमी, तर कळंबोली–चिखले–कोनपासून नवी मुंबई विमानतळापर्यंत नवा मेट्रो मार्ग विकसित करता येऊ शकतो का याची चाचपणी करण्यासाठी सिडकोने एका अभ्यासगटाची स्थापना केली आहे. याच अभ्यासगटामार्फत भविष्यात याच भागात वाहतुकीचे आणखी काही पर्याय आखता येतात का याविषयीचा अहवाल सादर केला जाणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रालगत सिडकोने तिसरी मुंबई वसविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे क्षेत्रफळ ५६१ चौरस किमी इतके असून हे नवे शहर ११ टप्प्यांत विकसित केले जाणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात आलेल्या शिवडी–न्हावाशेवा सागरी सेतूचे काम पूर्ण झाले असून लवकरच हा सेतू प्रवासासाठी खुला करण्यात येणार आहे.

या सागरी सेतूच्या पायथ्याशी असलेल्या गावांमधून महानगर प्राधिकरणाने आणखी एक लहानसे शहर वसविण्याचा प्रकल्प आखला असून त्यास राज्य सरकारची मंजुरी अपेक्षित आहे. सिडकोच्या नैना प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील १५२ पैकी ८० गावे वगळण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला असून मुंबई प्रदेश प्राधिकरणाकडे या गावांचा विकास करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

**पनवेलकरांना होणार फायदा**

**नैनाच्या या परिवहन अहवालामध्ये नैना क्षेत्रासोबत पनवेल शहर आणि नवीन पनवेल या वसाहतींमधील प्रवाशांना मेट्रोचा प्रवास करण्याची संधी मिळणार आहे. नवीन पनवेल, पनवेल बस आगार, पनवेल औद्योगिक वसाहत, कर्नाळा स्पोर्टस अकादमी येथून ही मेट्रो मार्गिका नवी मुंबई विमानतळ आणि उलवेपर्यंत जाणार आहे.**

पहिल्या टप्प्यात तारघर रेल्वेस्थानक ते अंबिवली असा १९ किमी अंतराच्या मेट्रो प्रकल्पाचा अभ्यास केला जाणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई विमानतळ प्रकल्पास जोडता येईल का याचाही अभ्यास केला जाणार आहे. याशिवाय कळंबोली–चिखले–कोन (एनएच ४ महामार्ग) हा मार्ग सिडकोच्या तळोजा एमआयडीसी ते खांदेश्वर (मेट्रो लाइन २), पेणधर ते एमआयडीसी तळोजा (मेट्रो लाइन ३) या मेट्रो मार्गांना जोडता येईल का याचाही अभ्यास केला जाणार आहे. याशिवाय कळंबोली–चिखले–कोन मार्गावरून कल्याण–तळोजा नियोजित मेट्रो मार्गाची जोडणी करून वर्तुळाकार मेट्रोची आखणी करणे शक्य होईल का हादेखील या अभ्यासाचा एक भाग असेल, अशी माहिती सिडकोकडून देण्यात आली.

## उरण शहरावर ८५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

### ओएनजीसीचे लाभणार सहकार्य

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण परिसराचे औद्योगिकरण होत असताना गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी उरण शहरातच ८५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. येथील ओएनजीसी प्रकल्पाच्या सहकार्यातून हे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्याचे नियंत्रण उरण पोलीस ठाण्यातून करण्यात येणार असल्याची माहिती वरीष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी दिली.

मराठा आरक्षणासाठी असलेली आंदोलनाची शक्यता, दत्तजयंती, नाताळ, थर्टीफर्स्ट आणि नवीन वर्षाच्या निमित्ताने उरण परिसरातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी गुरुवारी रात्री निकम यांनी पत्रकारांशी संवाद साधला. वाढते औद्योगिकरण, भविष्यात सुरू होणारी रेल्वेप्रवासी वाहतूक यामुळे गुन्ह्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असून यामुळे गांभीर्यही अधिक वाढणार आहे. त्यामुळे गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी उरण शहरातच ८५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. सीसीटीव्ही बसण्यासाठी ओएनजीसीची मदत मिळणार आहे. शहरात याआधीही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते, मात्र ते सध्याच्या काळात निकामी झाले आहेत. त्यामुळे सीसीटीव्हींच्या देखभालीचाही भार उचलावा यासाठी ओएनजीसी व्यवस्थापनाशी चर्चा सुरू असल्याचेही वपोनि. निकम यांनी सांगितले.

या वेळी मराठा आरक्षणासाठी असलेली आंदोलनाची शक्यता, दत्तजयंती, नाताळ, थर्टीफर्स्ट आणि नवीन वर्षाच्या निमित्ताने परिसरातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचीही माहितीही वपोनि. निकम यांनी दिली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ख्रिसमस कार्निवल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. २३) ख्रिसमस कार्निव्हल २०२३–२४ साजरा करण्यात आला.

सजविलेला ख्रिसमस ट्री, शिक्षक व विद्यार्थी संवाद साधत तसेच विद्यार्थ्यांनी लावलेल्या वेगवेगळ्या स्टॉलवरचा स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद, मनोरंजन असा मिलाफ महाविद्यालयामध्ये पहायला मिळाला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्यासाठी होती, तसेच त्यांनी या सर्व मनोरंजनाचा, स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या क्रिसमस कार्निवल २०२३–२४ आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती यांनी केले, तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. राहुल कांबळे, प्रा. अंकिता जांगीड व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.







**पनवेल : ग्रामस्थ मंडळ व श्री गावदेवी मित्र मंडळ खानाव आयोजित श्री विठ्ठल रखुमाई उत्सवास भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. त्यांचे ग्रामस्थ मंडळाकडून स्वागत करण्यात आले. या वेळी ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, खानाव उपसरपंच बाळाराम पाटील, सचिन दिसले, अनंता पाटील, विजय पाटील, वामन पाटील, अनिकेत पाटील उपस्थित होते.**

## निवडक

### पनवेलमधून तरुण बेपत्ता



**पनवेल** : डिलेव्हरी बॉय म्हणून काम करणारा एक तरूण घरगुती किरकोळ कारणावरून भांडण झाल्याने घरातून निघून गेला. तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कल्पेश बजरंग म्हात्रे (वय २८) असे या तरूणाचे नाव असून त्याची उंची पाच फुट पाच इंच, अंगाने सडपातळ, रंग सावळा, दाढी वाढलेली, उजव्या हातावर रूपाली नावाने इंग्रजीमध्ये गोंदलेले आहे, तसेच डाव्या हाताचे दंडावर जुन्या जखमेची खूण, अंगात राखाडी रंगाची ट्रॅक पॅन्ट, ग्रीन रंगाचा टी–शर्ट घातला आहे. या तरूणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२–२७४५२४४४) किंवा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मनोहर चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा.

### मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल** : आजारपणाला कंटाळून सुरीने गळा कापून घेऊन आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. रमेश (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही, वय अंदाजे ३० ते ३५ सध्या रा. बंबावीपाडा) असे असून त्याने स्वस्तिक इन्फ्रा लिमिटेड कंपनीच्या रूमवर आत्महत्या केली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२–२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक एन. एन. जगदाळे यांच्याशी संपर्क साधावा.

### मंगळसूत्र खेचून दोघे पसार

**पनवेल** : शहरातील सोसायटी नका येथून रेल्वेस्टेशनच्या दिशेने जाणाऱ्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगसूत्र खेचून अज्ञात चोरटे पसार झाल्याची घटना घडली आहे. मीनाक्षी महाजन या पनवेल शहरातील सोसायटी नाका येथून स्टेशनच्या दिशेने जात असताना लुटारूंनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पसार झाले आहेत.



**कळंबोली : राष्ट्रवादी काँग्रेसच्या पनवेल शहर जिल्हाध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव पाटील यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केली आहे. ते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आत्माराम पाटील यांचे बंधू आहेत.**

## खारघरमध्ये आढळला पहिला कोरोनाचा रुग्ण

### नागरिकांनी सतर्क राहण्याचे महापालिका प्रशासनाचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर वसाहतीमध्ये पहिला कोरोनाबाधित आढळला आहे. आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर हा बाधित त्याच्या घरात गृहविलगीकरणात राहिला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

खारघर वसाहतीमधील सेक्टर १६ येथील वास्तूविहार इमारतीमध्ये राहणाऱ्या ३३ वर्षीय व्यक्तीला कोरोनाची बाधा झाल्याची माहिती पालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली, तसेच कळंबोली वसाहतीमध्ये शुक्रवारी स्वाईन फ्ल्यूचा रुग्ण आढळला आहे. साथीचे आजार वाढल्याने रहिवाशांनी गर्दीच्या ठिकाणी जाण्यापूर्वी मुखपट्टीचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.

**कोणालाही अद्याप मुखपट्टी सक्ती करण्यात आली नसली तरी सार्वजनिक ठिकाणी किंवा गर्दीच्या ठिकाणी जाताना नागरिकांनी मुखपट्टी वापरावी, हात स्वच्छ धुवावे, ताप, सर्दी, खोकला असलेल्या रुग्णांनी महापालिकेने सुरू केलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रातून उपचार घ्यावेत.**
**–गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका**

कोरोनाबाधित पहिला रुग्ण आढळल्यानंतर आयुक्तांनी आरोग्य यंत्रणेचा आढावा घेऊन सर्व आरोग्यसेवकांसह पालिका प्रशासनाला कोरोना विरोधातील सामन्यासाठी सज्ज राहण्याची सूचना केली आहे. महापालिकेकडे असणाऱ्या प्राणवायूच्या क्षमतेसह पुरेसा औषधसाठा तसेच सरकारी उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णखाटा आणि पनवेल पालिका परिसरातील खासगी रुग्णालयामध्ये रुग्णखाटांचा आढावा घेतला आहे.

पनवेल महापालिकेचे आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्याबरोबर महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या झालेल्या बैठकीमध्ये पनवेल महापालिका क्षेत्रात १,२९१ रुग्णखाटा कोरोनासाठी उपलब्ध आहेत. प्राणवायू असलेल्या ७८९ रुग्णखाटा, अतिदक्षता विभागात २५८ रुग्णखाटा, व्हेंटिलेटर रुग्णखाटा ९४ आणि प्राणवायू नसलेल्या २४४ खाटा उपलब्ध आहेत.

## सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय गणित परिषद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात गणित विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व सामंजस्य करार भागीदार मराठा विद्या प्रसारक समाज, केटीएचएम महाविद्यालय, नाशिक व राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियानांतर्गत शुक्रवारी (दि. २२) राष्ट्रीय स्तरावरील गणित परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

परिषदेसाठी प्रमुख पाहुणे युजीसी. एचआरडीसी संचालक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रो. डॉ. सुभाष केंद्रे, रामानुजन संस्था मद्रास विद्यापीठाचे डॉ. के. कालीराज, केटीएचएम महाविद्यालय नाशिक येथील प्रा. डॉ. डी. बी. पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थित होते. या परिषदेच्या सुरुवातीला प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या किर्तीचा मागोवा घेऊन परिषदेचे महत्त्व विशद केले. या परिषदेची प्रस्तावना व पाहुण्यांची ओळख परिषदेचे समन्वयक व गणित विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. सुभाष उन्हाळे यांनी केली.

डॉ. एस. टी. गडदे यांनी आपल्या भाषणात गणित या विषयाचे आजच्या जीवनातील महत्त्व समजावून सांगितले. प्रो. डॉ. सुभाष केंद्रे यांनी, भिन्न समीकरण आणि अविभाज्य समीकरणाच्या सिद्धांतांविषयी माहिती दिली व विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली.

परिषदेच्या पहिल्या सत्रात डॉ. के. कालीराजयांनी फ्रॅक्शनल कॅल्कुलस ट्रान्सपोर्ट या विषयाचे महत्त्व पटवून दिले. परिषदेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. डी. बी. पाटील यांनी, इंटिग्रल ट्रान्सफॉर्म याविषयी मार्गदर्शन केले. या परिषदेमध्ये भारत भरातील विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयातील १२७ प्राध्यापकांनी आणि संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर ८५ संशोधन पेपरचे सादरीकरण करण्यात आले.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे समन्वयक व गणित विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. सुभाष उन्हाळे , गणित विभागाचे प्रा. सागर खैरनार, प्रा.नीलिमा घरत, प्रा. नेहा पाटील, प्रा. मयुरी जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले आणि आभार प्रदर्शन गणित विभागाचे प्रा. सागर खैरनार यांनी केले.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात शनिवारी (दि.२३)विज्ञानयात्री अंतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पालक–शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष सरिता कुलकर्णी, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रदर्शनाचे परिक्षण माध्यमिक विभागाच्या शिक्षिका तनुजा मोरे व विद्या मावलीकर यांनी केले. प्रदर्शनात इ. चौथी सिंहगडच्या विद्यार्थ्यांनी एका वस्तूच्या अनंत प्रतिमा या प्रयोगाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. इ. तिसरी भगतसिंगच्या विद्यार्थ्यांनी उत्सर्जन संस्था हा प्रयोग सादर करून तिसरीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला तर इ. दुसरी यमुनाच्या विद्यार्थ्यांनी पाण्याची घनता हा प्रयोग सादर करून दुसरीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

इ. पहिली जुईच्या विद्यार्थ्यांनी जलप्रदुषण हा प्रयोग सादर करून पहिलीतून प्रथम क्रमांक संपादन केला.



# पिक्चर हिट, तेथेच सेलिब्रेशन... रियल शो





पिक्चर कोणासाठी बनवले जातात?... पब्लिकसाठी! काही चित्रपट जगभरातील अनेक चित्रपट महोत्सवात दाखल व्हावेत, त्याचे कौतुक व्हावे, इंग्लिश मीडियाने दखल घ्यावीच, त्यांना पुरस्कार प्राप्त व्हावेत यासाठीच निर्माण होतात ती 'स्टोरी'च वेगळी.

पिक्चर पाहतो नि नाकारतो कोण?... पब्लिक. यह पब्लिक है पब्लिक. सब जानती है. आपल्याला आवडलेला चित्रपट ते पडद्यावर ठेवत नाहीत. ते डोक्यात घेतात, डोक्यावर घेतात. त्यावर जमेल तसं मनमुराद मनसोक्त व्यक्त होतात आणि आपल्याला न आवडलेला चित्रपट ते फार काळ चित्रपटगृहात ठेवू देत नाहीत. शेरे ताशेरे मारतात. तो आपला हक्क समजतात. आपण कोणता चित्रपट एन्जॉय करायचा आणि कोणता नाकारायचा याचे सगळेच हक्क प्रेक्षकांच्या स्वाधीन. ही वस्तुस्थिती न स्वीकारता पिक्चर फ्लॉप झालेले उगाच ओरडतात, प्रेक्षकांना हवयं तरी काय? याचं उत्तर सोपे आहे, तुम्ही जे दाखवताय ते नको.

पिक्चर हिट झालं त्याच थेटरात, त्याच पब्लिकसोबत यश साजरं करणं ही गोष्टच वेगळी. त्याचाही झक्कास फ्लॅशबॅक आहे याची कदाचित तुम्हाला कल्पना नसेल.

ताजं उदाहरण, 'बाईपण भारी देवा'च्या यशाच्या धमाल सेलिब्रेशनचे. तसं ते सुपर हिट पिक्चरच्या फर्स्ट शोपासूनच पब्लिकच्या उत्स्फूर्त टाळ्या शिट्ट्यांनी सुरूच असते. कधी पडद्यासमोर नाचकामही (पिक्चर असा बघायचा असतो का असा गंभीर प्रश्न कोणी करेलही, पण एकदा का आपण सिनेमाचे झालो की असे प्रश्न मागे मागे पडतात.)

'बाईपण...'चे यश प्लाझा चित्रपटगृहात मस्त साजरे झाले. सुकन्या कुलकर्णी आपल्या नव्वद वर्षांच्या आईसोबत आली हा खूपच भावनिक क्षण. वंदना गुप्ते, शिल्पा नवलकर, दीपा परब वगैरे या आनंदात सहभागी होतेच. धमाल आली. याची रिल्स बनली. त्यांना भरभरुन लाईक्स आल्या.

पूर्वीही असं प्रेक्षकांसह यश साजरं झालं. 'शोले' यशाच्या गोष्टी कधीच न संपणाऱ्या. मिनर्व्हात हुकमी हाऊसफुल्ल गर्दीत सुरू असतानाच एकदा विजू खोटे (पिक्चरमधला 'कालिया') 'शोले' पाह्यला आला आणि पब्लिकसोबत त्याने तो एन्जॉय केला. त्या काळात आपलाच चित्रपट पाहण्यासाठी एक तर मिनी थिएटरमधील खास शो अथवा प्रत्यक्षात चित्रपटगृहात जाऊन तो पाहणे एवढाच मार्ग असे. अमजद खान चक्क मिनर्व्हातील १३०व्या आठवड्यात 'शोले' पाह्यला आल्याचा फोटो सोशल मीडियात पाह्यला मिळतो. 'शोले'चं यश अद्भूत आणि मनोरंजक.

दादा कोंडके यांनी मराठीतून हिंदीत पाऊल टाकताच 'तेरे मेरे बीच मे' या मसालेदार मनोरंजक चित्रपटाने मुंबईत इंपिरियल थेटरात आणि हैदराबाद शहरात रौप्यमहोत्सवी यश संपादले. दादा कोंडके कायमच जनसामान्यांत रमणारे. त्यांनी हैदराबादला हाऊसफुल्ल गर्दीत आपल्या पहिल्या हिंदी चित्रपटाची ज्युबिली साजरी केली. विशेष उल्लेखनीय गोष्ट, आपल्या या यशात सहभागी करण्यासाठी मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांना आवर्जून नेले. एक वेगळाच अनुभव होता तो. अन्य राज्यांच्या शहरात आपल्या एका मराठी कलाकाराला उत्स्फूर्त दाद मिळतेय हे केवढे तरी सुखावणारे होते. तेलगू भाषिक रसिकांचा आपल्या हिंदी चित्रपटाला मिळत असलेल्या रिस्पॉन्सने उषा चव्हाणही कमालीची इम्प्रेस झाल्याचे आठवतंय. दादांनी अशी पब्लिकसोबत ज्युबिली एन्जॉय केली.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मास्टर भगवानदादा यांच्या 'अलबेला'मधील भोली सूरत दिल के खोटे, शोला जो भडके दिल मेरा धडके, श्याम ढले खिडकी तले ही गीता बालीसोबतची गाणी आजही लोकप्रिय आहेत. हा चित्रपट मुंबईत १४ डिसेंबर १९५१ रोजी प्रदर्शित झाला. मेन थिएटर इंपिरियल. भगवानदादांचे पिक्चर तोपर्यंत ताज, निशात अशा पिला हाऊसच्या थेटरात प्रदर्शित होत. पहिल्यांदाच त्यांचा चित्रपट मुख्य प्रवाहातील चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. एका फिल्मी पार्टीत राज कपूरने त्यांना हे सुचवले आणि दादांनी ते मनावर घेतले असा किस्सा प्रसिद्ध आहे, पण पहिले दोन आठवडे पिक्चरचा फारसा रिस्पॉन्स नव्हता. स्वत: भगवानदादा इंपिरियल थिएटरवर जाऊन 'पब्लिक रिस्पॉन्स'चा कानोसा घेत. हळूहळू गाणी लोकप्रिय होत गेली. लाऊडस्पीकरपासून इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्सपर्यंत ती वाजली जाऊ लागली. लग्न, बारसं, महापूजा, सणात वाजली जाऊ लागली, त्यावर पब्लिक रोम्बा सोम्बा डान्स करू लागली. गाना सॉलीड हिट, पिक्चर हिट. सत्तरच्या दशकात रिपीट रनला 'अलबेला' आला आणि रसिकांची बरीच पुढची पिढी असूनही गाण्यांच्या लोकप्रियतेवर पिक्चर पुन्हा हाऊसफुल्ल गर्दीत चालू लागले. या यशाची माध्यमातून सकारात्मक चर्चा होऊ लागली. अशा यशाचे सेलिब्रेशन व्हायला हवे ना?

'अलबेला'ची पन्नाशी इंपिरियल थिएटरमध्येच साजरी करण्याचे ठरले. एव्हाना पन्नाशच्या दशकातील चित्रपट रसिकांनी वयाची सत्तरी गाठली होती, पण सिनेमाचे व्यसनी मनाने कायमच तरुण असतात. त्यांना फक्त 'चार्ज' होण्यासाठी संधी हवी असते. ती मिळाली. इंपिरियलमधील विशेष खेळात 'अलबेला' एन्जॉय केला आणि जवळच्याच एका हॉलमध्ये अनेकांनी आपल्या आठवणी जागवल्या. एक अद्भूत सेलिब्रेशन. माणसाला फ्लॅशबॅकमध्ये जायला नक्कीच आवडते. त्यासाठी असा मौका हवा.

'हम आपके है कौन'(मुंबईत रिलीज ५ ऑगस्ट १९९४)च्या लिबर्टीतील यशाला २०१९मध्ये पंचवीस वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त असेच एक कौटुंबिक सेलिब्रेशन रंगले. खुद्द माधुरी दीक्षितचं त्यात येणं, असणं, रमणं डिजिटल मीडियात भरभरून व्ह्यूज, लाईक्स, कॉमेन्टसचे ठरले. पिक्चरची पंचवीस वर्षांनंतरही क्रेझ. याला म्हणतात चित्रपट रसिकांचे अस्सल प्रेम. म्हणजे याच लिबर्टीत महागड्या तिकीटात (पहिल्यांदाच तीन आकडी तिकीट दर. शनिवार रविवारच्या शोना) तब्बल १०२ आठवड्यांचा मुक्काम भारी ठरला होता. प्रत्यक्षातील लग्न सोहळ्याचं कल्चर बदलून गेले (महागही झाले), त्यातील कपडे, वस्त्रलंकाराची फॅशन आली. सतत काहीना काही कारणास्तव पिक्चर, त्याची गाणी, काही दृश्ये कुठेना कुठे आजही चर्चेत असतात. पिक्चर जुनं होण्याची शक्यताच नव्हती. पंचवीस वर्षांनंतरही ते आजचेच राहिले.














'हीरो' (रिलीज १६ डिसेंबर १९८३)च्या यशाची पस्तीशी सुभाष घईंनी सेलिब्रेट केली. त्यांच्या मुक्ता आर्ट्सचाही पहिलाच चित्रपट. फर्स्ट रनला ताडदेव नाक्यावरील गंगा चित्रपटगृहात ज्युबिली हिट मुक्काम केला. पिक्चरच्या पस्तीशीत गंगा व जमुना ही जुळी थिएटर बंद होती. म्हणून न्यू एक्सलसियरला सेलिब्रेशन केले. जॅकी श्रॉफ भाव खाऊन गेला. एव्हाना सोशल मीडियाच्या युगात आपण आलो होतो. घई व जॅकीने जुन्या आठवणींना हसत खेळत उजाळा दिला. संजय दत्तच 'हीरो' होता. नेमक्या याच काळात तो ड्रॅग डिक्ट झाल्याने उपचारासाठी अमेरिकेत गेला. घईने त्याच्यासोबत 'विधाता' केला होता. कमल हसन बिझी असल्यानेच नाही म्हणाला. कुमार गौरवने दाढीला नकार दिला आणि त्याचा पिता राजेंद्रकुमारने जास्त मानधन मागितले. घईने त्याच वेळेस देव आनंदच्या 'स्वामी दादा'मध्ये शक्ती कपूरचा राईट हॅण्ड साकारत असलेल्या जॅकी श्रॉफला 'हीरो' केला और उसकी तकदीर चमक गई भिडू. मॉडेल से स्टार बना. पस्तीस वर्षांनी हे सगळे ऐकणे रंजकच.

निर्माता सुधाकर बोकडेने म्युझिकल रोमॅन्टिक 'साजन' (१९९१)च्या ज्युबिली हिटची अंधेरीतील एका पंचतारांकित हॉटेलमधील पार्टी साजरी केली. क्वचितच फिल्मी पार्टीत येणारी माधुरी दीक्षित या पार्टीत आली आणि ज्युबिलीची ट्रॉफी घेऊन आपल्या आईसोबत निघालीही. बोकाडेने लॉरेन्स डिसोझा दिग्दर्शित 'साजन'चं यश याहीपेक्षा वेगळ्या पध्दतीने साजरे केले. मुंबईतील ड्रीमलॅन्ड थिएटरमध्ये पिक्चर पंचवीसाव्या आठवड्यात सुरू असतानाच थिएटरच्या वॉचमनपासून डोअर्स किपरपर्यंत सगळ्यानाच संगीतकार नदीम श्रवण यांच्या हस्ते ट्रॉफी (स्मृतिचिन्ह) देत गौरव केला. पब्लिकची गर्दी होतीच.

चित्रपटगृह आणि त्यातील गर्दी हा पिक्चरच्या यशाचा सही फंडा. तेथेच सेलिब्रेशन ही कल्पनाच उत्तम. पंचतारांकित हॉटेलमधील महागड्या खर्चातील 'पार्टी' ही चित्रपटसृष्टीची परंपरा, पण त्याची संधी पब्लिक देते, समझे!

## नामवंत साहित्यिक
# साने गुरुजी

पांडुरंग सदाशिव साने ज्यांना आपण साने गुरुजी म्हणून ओळखतो. मराठी साहित्यातील प्रसिद्ध लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि स्वातंत्र्यसेनानी होते. पांडुरंग साने यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सदाशिव साने आणि आईचे नाव यशोदाबाई साने होते. त्यांच्या आयुष्यात त्यांच्या आईच्या शिक्षणाचा खूप प्रभाव पडला. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला.

साने गुरुजी यांनी इंग्रजी साहित्यामध्ये एमए ही उच्च पदवी मिळवली होती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलमध्ये वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली. वसतिगृहात राहूनच त्यांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा धडा शिकवला. अमळनेर येथे तत्वज्ञान मंदिरात त्यांनी तत्वज्ञानाचे शिक्षण घेतले.

१९२८मध्ये त्यांनी 'विद्यार्थी' हे मासिक सुरू केले. महात्मा गांधींच्या



विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. साने गुरुजी यांनी राष्ट्रसेवा दलाची स्थापना केली. 'पत्री' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून साने गुरुजींच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील बलसागर भारत होवोसारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या होत्या.

१९३०मध्ये साने गुरुजी त्रिचनापल्लीच्या तुरुंगात होते. त्या वेळी दक्षिणेकडच्या अनेक भाषिकांशी त्यांचा संबंध आला. अनेक भाषांचे वैभव आपल्याला अज्ञात असल्याचे त्यांना जाणवले. आपण भारतात राहत असूनही इथल्या वेगवेगळ्या प्रांतांत बोलल्या जाणाऱ्या भाषांची माहिती आपल्याला नसते. या भाषा शिकायच्या असल्यास तशी संस्थाही आपल्याकडे नाही याची खंत नेहमी साने गुरुजींना वाटायची. यातूनच 'आंतरभारती'ची संकल्पना त्यांना सुचली.

साने गुरुजी यांनी आपल्या आयुष्यातील शेवटची अनेक वर्षे रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णेजवळच्या आपल्या मूळ गावी पालगड येथे काढली. तेथे त्यांचे राहते घर आजही चांगल्या प्रकारे ठेवले आहे. ते ज्या शाळेत जात होते ती प्राथमिक शाळाही आज चालू आहे. पालगड हे मंडणगडनजीक दापोली तालुक्यात दुर्गम भागात आहे. जाणते पर्यटक या गावाला व घराला आवर्जून भेट देतात. ११ जून १९५० रोजी त्यांनी आत्महत्या केली.

साने गुरुजींची पुतणी सुधाताई बोहोडा यांनी साने गुरुजींचे हे राहते घर राष्ट्राला अर्पण केले. त्यानंतर या घराची देखभाल वडघरचे साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ही संस्था करीत आली आहे. **(साभार : इंटरनेट)**

# राष्ट्रीय ग्राहक दिन

सन २०००मध्ये प्रथमच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला होता. आजच्या दिवशी ग्राहकांना त्यांच्या अधिकारांची माहिती मिळावी आणि ते याबाबत जागरूक व्हावेत यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात, तर दरवर्षी १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा केला जातो. भारतात दरवर्षी २४ डिसेंबरला राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो.



१९८६मध्ये आजच्याच दिवशी ग्राहक संरक्षण कायदा तयार करण्यात आला, तर सन १९९१ आणि १९९३मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. या कायद्याचा जास्तीत जास्त वापर केला जावा म्हणून डिसेंबर २००२मध्ये पुन्हा या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. यानंतर १५ मार्च २००३पासून या कायद्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. तथापि, या कायद्यातसुद्धा १९८७मध्ये सुधारणा करण्यात आली होती, परंतु ५ मार्च २००४ रोजी याची संपूर्ण अधिसूचना देण्यात आली.

केंद्र सरकारने या वर्षी जुलैमध्ये ग्राहक संरक्षण कायदा २०१९अंतर्गत नवीन ई-कॉमर्स नियम लागू केले आहेत. वास्तविक, ऑनलाईन शॉपिंगच्या ट्रेंडमुळे हे बदल केले गेले आहेत. ऑनलाईन खरेदी प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात फसवणुकीच्या तक्रारी समोर येत आहेत. हे नवीन नियम ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, स्नॅपडीलसारख्या ई-कॉमर्स साईटवरही लागू होतील. त्यात ई-कॉमर्स साईटसाठी अनेक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. नवीन नियमांनुसार बनावट व भेसळयुक्त वस्तू विकणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी हा कायदा अमलात आला आहे. या कायद्यांतर्गत कोणताही ग्राहक कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक व्यापाराची तक्रार करू शकतो, ज्यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळातील व्यापारांच्या व्यवहाराची हाताळणी लक्षात घेऊनच हा कायदा लागू करण्यात आला होता.

एक नागरिक म्हणून राज्यघटनेने आपल्याला नागरिकत्वाचे हक्क दिले तसेच ग्राहक म्हणूनही काही अधिकार देण्यात आले आहेत. त्यातील पहिला आणि सर्वांत मोठा हक्क म्हणजे ग्राहकांना दिलेल्या किंमतीच्या समान वस्तू त्यांना मिळाली पाहिजे. वाजवी किंमत आणि शुद्धता या ग्राहकाच्या मुख्य गरजा आहेत. ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी ग्राहक संरक्षण कायदा बनविला गेला आहे. या कायद्यानुसार आता कोणताही ग्राहक अनुचित व्यापाराची तक्रार करू शकतो. यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळात व्यावसायिकांच्या व्यवहारात होणारी हेराफेरी लक्षात घेऊनच हा कायदा बनवला गेला आहे.

**(साभार : इंटरनेट)**

# ख्रिसमस अर्थात नाताळ



ख्रिस्ती लोकांचा ख्रिसमस अर्थात नाताळ हा एक मुख्य सण असून तो दरवर्षी २५ डिसेंबर या दिवशी येशू ख्रिस्त यांचा जन्म दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो. हा सण ख्रिश्चन धर्मीयांसाठी महत्त्वाचा सण म्हणून पाहिले जाते. प्रभू येशू ख्रिस्त हे ख्रिस्ती धर्माचे संस्थापक म्हणजेच प्रवर्तक मानले जातात.

सकल मानवजातीला येशू ख्रिस्तांनी अहिंसा, मानवप्रेम, शांती व मानवतेची शिकवण दिली. नाताळ हा ख्रिश्चन लोकांसाठी आनंदाचा अन् हर्षोल्हासाचा सण असला तरी या सणात आता इतर धर्मांचे लोकदेखील स्वेच्छेने सहभागी होऊन ख्रिसमसचा आनंद लुटत असतात. त्यामुळे या सणाची व्याप्ती खऱ्या अर्थाने विस्तृत झाली आहे. तथापि, ख्रिसमस हा सण ख्रिस्तींसाठी आनंदाची पर्वणीच असते. भारतात विभिन्न धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. त्यामुळे साऱ्या देशात विविधतेत एकता असल्याचे दृष्टोत्पत्तीस येत असून भारत हा सर्वधर्मसमभावाचे प्रतिक असल्याचे सिद्धीस येते.

जगात आजच्या घडीला महाशक्ती या लहान देशांना, त्यांच्या प्रदेशांना बळाचा वापर करून गिळंकृत करण्यासाठी अणूशस्त्रांचा वापर करीत आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर सर्वत्र अशांतता व अस्थिरतेचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वांनी प्रभू येशू ख्रिस्ताच्या शांती, अहिंसा अन् मानवतेच्या शिकवणीचा अंगिकार करण्याची गरज आहे. त्याशिवाय दुसरा तरणोपाय नाही हे स्पष्ट दिसते. एकमेकांचा भूप्रदेश युद्धाच्या मार्गाने हडप करण्यासाठी हजारो निरपराध नागरिकांचा नाहक बळी दिला जाताहे ही लांच्छनास्पद गोष्ट आहे. या सर्व अपप्रकारांवर पायबंद घालण्यासाठी प्रभू येशू ख्रिस्ताचे विचार मानवजातीने अंगिकारावेत म्हणजे हीच खरी येशूंना मानवंदना ठरेल.

नाताळ हा सण २५ डिसेंबरला असला तरी ख्रिस्ती लोक या सणाची तयारी १० दिवस अगोदरपासूनच सुरू करतात. या काळात त्यांच्या घरी गोड पदार्थ बनविण्याची कामे सुरू होतात. त्याप्रमाणेच नवनवीन कपडे, नवीन वस्तू खरेदी करण्याची लगबग सुरू होते. नाताळ सणाचा आनंद नातेवाईक अन् मित्रमंडळीसोबत साजरा करताना ख्रिस्ती बांधव हे वाईन, फळेमिश्रित नाताळ केक, भाजलेली टर्की, पुडींग, चॉकलेटचे विविध प्रकार, बिस्किटे, बटाट्याच्या चिप्स, अंड्याचे-मांसाहारचे विभिन्न पदार्थ भोजनासाठी तयार करून ख्रिसमसची मजा लुटतात. ईसाई धर्माच्या धार्मिक मान्यतेनुसार येशू ख्रिस्त मसिह यांचा जन्म २५ डिसेंबरला झाला होता. या पार्श्वभूमीवर हा दिवस ख्रिसमस म्हणून साजरा केला जातो.

सन ३६० ईसवीला रोमच्या चर्चमध्ये पहिल्या वेळेस ईसा मसिहचा जन्म दिवस साजरा केला गेला. येशूची आई मारिया अन् वडील जोसेफ यांचा पुत्र येशू मसिहचा जन्म बेथलेहेम येथे झाल्याचे बायबल या ख्रिस्ती लोकांच्या धर्मग्रंथात नमूद केले आहे. ख्रिश्चन लोकांच्या श्रद्धेनुसार नाताळ हा सण १२ दिवसांच्या ख्रिसमस्टाईड नावाच्या पर्वाची सुरुवात करतो.

या दिवशी ख्रिश्चन अनुयायी हे एकमेकांना भेटून परस्परांना नाताळ शुभेच्छापत्र अन् भेटवस्तू देत असतात अन् गळाभेट घेऊन शुभेच्छा व्यक्त करतात. याशिवाय ख्रिसमसला ख्रिस्तीधर्मीय हे आपल्या घरांना तसेच अवतीभोवतीच्या परिसराला रंगबिरंगी रोषणाई करून सजवित असतात. तथा सकाळच्या प्रहरी चर्चमध्ये सहकुटुंब जाऊन आपल्या परिवारासाठी अन् सकल मानवजातीला आनंदमय जीवन व सुख-शांती लाभावी यासाठी प्रभू येशूला प्रार्थना करतात. याशिवाय ख्रिसमसला चर्चमध्ये जाऊन शाळेकरी मुलं-मुली विभिन्न वाद्यवृंदांचा वापर करून सामूहिकरित्या नाताळ गीते (कॅरोल्स) गातात. या गीतांना नोएल असेही संबोधिले जाते. नाताळ केक हे ख्रिसमसचे मोठे आकर्षण असून त्यावर मेरी ख्रिसमस असे नमूद केले जाते. त्याचा सर्वांना आस्वाद मिळतो. महत्त्वाचे म्हणजे या दिवशी सरकारकडून देशभरात सार्वजनिक सुट्टी जाहीर केलेली असते.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ख्रिसमस ट्री हा नाताळ सणाचा एक अविभाज्य घटक असून तो विविध वस्तूंनी, रंगबिरंगी रोषणाईने सजविला जातो.इतकेच नव्हे तर सांताक्लॉज ही एक काल्पनिक व्यक्तीरेखा असून त्याला मराठीत नाताळबाबा असेही म्हणतात. त्याच्याजवळ भेट वस्तूंची, चॉकलेट, केकने भरलेली मोठी पिशवी असते. रात्रीच्या प्रहरी सांताक्लॉज हा गल्लोगल्ली फिरत लहान मुलांना भेटून त्यांना हॅपी ख्रिसमस अशा शुभेच्छा व्यक्त करत भेटवस्तू देतो. या वेळी मेरी ख्रिसमस ॲण्ड ए हॅपी न्यू इयर हा नाताळ शुभेच्छा संदेश जागोजागी प्रसारित केला जातो.

विशेष बाब म्हणजे बायबल ग्रंथात येशू ख्रिस्त यांना मरियम पुत्र, परमेश्वराचा पुत्र, प्रभू येशू, ख्रिस्त, जिझस क्राईस्ट, ईसा मसिह या नावांनी संबोधले गेले आहे. पहिले पोप लिबेरिअस यांनी इसवी सन ३५३ ते ३५४ या वर्षादरम्यान जगातील समस्त ख्रिस्ती धर्मियांसाठी २५ डिसेंबर हा येशूचा जन्म दिवस म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले. येशू ख्रिस्तच्या जन्मापासूनच्या वर्षाला नो डोमिनी म्हणजेच प्रभूचे वर्ष असं म्हणण्याचा प्रघात पडल्याचे सांगण्यात येते. अत: ख्रिश्चन बंधू-भगिनी तथा विद्यार्थी मित्रांना ख्रिसमसच्या हार्दिक शुभेच्छा! मेरी ख्रिसमस!

**-रणवीर राजपूत**

# सलग सुट्ट्यांमुळे बोरघाटात लागल्या वाहनांच्या रांगा

## कोंडी सोडविताना महामार्ग पोलिसांची दमछाक





**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खालापूर टोल नाका ते खोपोली बायपास तसेच पुढे अमृतांजन ब्रिज मार्गावर बोरघाटात शनिवारी (दि. २३) मोठी वाहतूक कोंडी झाली. सुमारे पाच किमीच्या रांगा लागल्या होत्या. ही कोंडी सोडविण्यासाठी महामार्ग पोलिसांची चांगलीच दमछाक उडत होती.

शनिवार, रविवार, सोमवार असे सलग तीन दिवस सुट्या असल्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील पर्यटक लोणावळा, खंडाळा, पश्चिम महाराष्ट्र तसेच जेजुरी, पंढरपूर तुळजापूर अशा धार्मिक ठिकाणी देवदर्शनाबरोबर पर्यटन असा बेत आखून घराबाहेर पडले, मात्र शनिवारी सकाळपासून द्रुतगती मार्गावरील खालापूर टोल नाका व बोरघाटात वाहनांची संख्या लक्षणीय वाढल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली.

मार्गावर किमान १५ गाड्यांच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याने काही गाड्या मार्गावरच बंद पडल्याचे चित्र होते. यामुळे मागून येणारी वाहतूक ठप्प झाली होती. यासह नाताळ सण आणि २०२३वर्षाची अखेर यामुळे मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना शनिवारी करावा लागला.

बोरघाटातील अवघड वळण व चढचावर गाड्या हळू चालवाव्या लागल्याने नवशिके ड्रायव्हर क्लच कंट्रोल करता न आल्याने अनेक गाड्या ब्रेकडाऊन झाल्या.

अचानक रस्त्यावर गाड्या बंद पडल्यानेदेखील वाहतुकीला अडथळा होतो. शिंग्रोबा मंदिर ते मॅजिक पॉईंट तसेच एचओसी ब्रिजखाली बस अपघात झालेल्या वळणावर अनेक कार बंद अवस्थेत अडकल्या होत्या. ही कोंडी सोडविण्यासाठी बोरघाट पोलिसांच्या नाकीनऊ आले. शेवटी तीन तासांच्या अथक प्रयत्नाने महामार्ग पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

बोरघाटात वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी दुपारी २ वा. पर्यंत अवजड वाहनांना बोरघाटात वाहतूक बंदी केली होती, तरीही कारसारखी लहान वाहने मोठ्या संख्येने आल्याने वाहतूक कोंडी झाली होती, तर वाहने कासवगतीने सुरू होती.

खोपोलीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक व खोपोली-पेण मार्गावरील पाली फाटा येथेही वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे नागरिकांचा चांगलाच खोळंबा झाला.

# माथेरानमध्ये ई-रिक्षा लवकरच धावणार

## मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची माहिती



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

गेल्या मार्चपासून बंद असलेला ई-रिक्षा प्रकल्प सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवकर सुरू करण्यात येईल, अशी माहिती माथेरान नगरपालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी दिली. त्यामुळे माथेरानकर नागरिकांसह पर्यटकांमध्येही समाधानाचे वातारवण आहे.

मार्च महिन्यापासून बंद असलेल्या ई-रिक्षा नगरपालिकेच्या आवारात उभ्या आहेत. त्यांची दुरूस्ती करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, लवकरच त्या वापरण्यास योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ई-रिक्षा माथेरानकरांच्या सेवेत दाखल होतील, असेही मुख्याधिकारी इंगळे यांनी सांगितले. त्यामुळे अनेक दिवस प्रतीक्षा करीत असलेल्या ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व शाळेच्या विद्यार्थांची सोय होणार असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

ई-रिक्षा सुरू झाल्याने माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांमध्ये वाढ होईल, असा विश्वास स्थानिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून ई-रिक्षा बंद असल्याने ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थ्यांसह पर्यटकांचेही काही प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे ई-रिक्षा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी पालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची भेट घेऊन निवेदन दिले. मुख्याधिकाऱ्यांनी दखल घेत लवकर रिक्षा सुरू करण्याचे संकेत दिले आहेत.

नगपालिका कर्मचारीदेखील रिक्षा सुरू करण्यासाठी कामाला लागले असून, इतर सर्व बाबी तपासून तसा अहवाल तयार करण्यात गुंतले आहेत. मुख्याधिकारी यांनी घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे माथेरानमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**ई-रिक्षा लवकर सुरू होणार असल्याने शाळेच्या विद्यार्थ्यांची पायपीट वाचणार असून मुलांना अभ्यास चांगल्या प्रकारे वेळ मिळेल.**

**-अश्विनी मोरे, पालक, इंदिरा गांधीनगर, माथेरान**

**सुप्रीम कोर्टाच्या आदेशान्वये नगर परिषदेमार्फत जसा आहे तसाच पायलट प्रोजेक्ट पुढे सुरू ठेवण्यात येत आहे. त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.**

**-राहुल इंगळे, मुख्याधिकारी, माथेरान नगर परिषद**

# चौकमध्ये ढगाळ वातावरण

## केंद्रावरील भाताचे नुकसान होण्याची शक्यता

**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरात ढगाळ वातावरणामुळे पावसाची शक्यता निर्माण झाल्याने खरेदी विक्री केंद्रावर आणलेल्या भाताचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शासकीय नियमाने भातखरेदी सुरू झाली आहे. खालापूर तालुक्यात एकमेव भात खरेदी केंद्र चौक या ठिकाणी नेताजी पालकर सहकारी भात गिरणी येथे आहे. येथे शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणावर भात आणले आहे, मात्र सध्या हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तविला असल्याने या ठिकणी भातगिरणीच्या बाहेर उघड्यावर असून ताडपत्री टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न केला असल्याचे दिसत आहे. अनेक आपत्तीतून शेतकरी याने भात पिकवला आहे. भात सुरक्षित राहिल अशी व्यवस्था देखील नाही, त्यामुळे शेतकरी चिंतेत पडला आहे.

पावसात भात भिजून नुकसान होऊ नये यासाठी खरेदी केंद्राने सोय करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



# खोपोलीत राष्ट्रीय गणित दिन उत्साहात

## ३०२ विद्यार्थ्यांसमवेत १८ शिक्षकांचा सहभाग



**खोपोली : प्रतिनिधी**

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचालित आणि अप्लाईड मटेरियल सहयोगाने बालविज्ञान शोधिका चिलठण अंतर्गत नारंगी, सावरोली, ठाणेन्हावे, जांबरुंग या शाळांमध्ये राष्ट्रीय गणित दिन शुक्रवारी (दि. २२) साजरा करण्यात आला. या वेळी ३०२ विद्यार्थ्यांसमवेत १८ शिक्षकांनी सहभाग घेतला.

लोकांमध्ये गणित विषयाचे महत्त्व आणि उगम याची जाणीव करून देण्यासाठी २२ डिसेंबर हा दिवस श्रीनिवास रामानुजन यांच्या कार्यांना ओळखण्यासाठी प्रामुख्याने हा दिवस साजरा केला असतो. या वेळी विद्यार्थ्यांनी गणित प्रतिकृतीद्वारे, क्रिया व्यवस्थित सादर करून माहिती दिली.

या कार्यक्रमास शाळांचे मुख्याध्यापक शिल्पा पाटील नारंगी शाळा, जयंत पाटील ठाणे न्हावे, बळीराम चव्हाण सावरोली, जगदेवी सोनटके जांबरुंग शाळा यांच्यासमवेत सर्व शिक्षकवर्ग व सहकारी तथा प्रथमचे सहकारी सेंटर इन्चार्ज रणजित वाघमारे, विज्ञान मित्र अश्विनी भगत, विजय वानखडे आणि पूजा भोईर यांच्या सहकार्यातून हे कार्यक्रम झाले.

# १७६ शिक्षकांना सर्वंकष मूल्यमापनाचे धडे



**पेण : रामप्रहर वृत्त**

अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन टप्पा-२ चे प्रशिक्षण १९ ते २३ डिसेंबर या कालावधीत पेण तालुकास्तरीय प्रशिक्षण सौ. म. ना. नेने कन्या विद्यालय, पेण येथे तीन गटात सुरू होते. आनंदी वातावरणात गटकार्यात शिक्षक रमलेले चित्र पहावयास मिळाले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल, जिल्हा परिषद अलिबाग व पंचायत समिती पेण यांच्या संयुक्त विद्यमाने गटशिक्षणाधिकारी अरूणादेवी मोरे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाने सुरू असून, या प्रशिक्षणाचे उत्तम नियोजन व व्यवस्थापन निलेश मानकवळे, पुरूषोत्तम म्हात्रे, हितेंद्र म्हात्रे, करूणा भोईर, हर्षला शेळके, प्रवीण मगर करत आहेत. या प्रशिक्षणात १७६ शिक्षकांनी पाच दिवसांचे प्रशिक्षण घेतले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी मौजे. नेरेपाडा, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकतीचे मालक श्री. बाळकृष्ण रामभाऊ म्हात्रे, श्री. उल्हास रामभाऊ म्हात्रे, वनिता रामचंद्र पाटिल, नंदिनी अच्युत साळवी, गुलाब शशिकांत रोडपालकर, श्री गोपीनाथ अनंत पाटिल, जयश्री दत्तात्रेय म्हात्रे, रंजना विष्णू भालेकर, कविता प्रकाश पोपेटा, राजेश्री प्रकाश भोईर यांचे कडुन आमचे अशिल श्री. संदिप शांताराम म्हात्रे हयांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे. नेरेपाडा, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ. क्र. | भुमापन/गट क्रमांक | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | पोटखराबा | एकुण क्षेत्र | आकारा रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १११ | | ०.२६.०० | ०.०२.८० | ०.२८.८० | ४.५६ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिसपत्र, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु, हुकूमनामा, मनाई हुकूमाचे आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबध निगडती असल्यास अगर सदर व्यवहारास कोणाची हरकत असल्यास अशा हितसंबधीत व्यक्ती, संस्था इत्यांदींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर नोटीस प्रसिदधू झाल्यापासून २१ दिवसांचे आत आमचे खालील प्रमाणेचे पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीं वरील श्री. बाळकृष्ण रामभाऊ म्हात्रे, श्री, उल्हास रामभाऊ म्हात्रे, वनिता रामचंद्र पाटिल, नंदिनी अच्युत साळवी, गुलाब शशिकांत रोडपालकर, श्री. गोपीनाथ अनंत पाटिल, जयश्री दत्तात्रेय म्हात्रे, रंजना विष्णू भालेकर, कविता प्रकाश पोपेटा, राजेश्री प्रकाश भोईर यांचे मालकी हक्क हितसंबध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहित, हे सर्व जाहिर व्हावे.

पनवेल.
ता. २२/१२/२०२३

**सही/-**
**ॲड. किरण गवते**
बी.ए.एल.एल.बी

**पत्ता :- पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड. पिन. ४१०२०६, मो. ८६५२०४८४५३/ ९९३०१२२४१२**


# अलिबागमध्ये लायन्स किहीम फेस्टिव्हलचे शानदार उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**

लायन्स क्लब मांडवाने सामाजिक कार्यात चांगली झेप घेतली असून फेस्टिव्हलमधून संकलित होणार निधी लायन्स पॅथॉलॉजी लॅब, चोंढी-किहीमसाठी उपयोगात आणला जाणार आहे, असे प्रांतपाल अमरचंद शर्मा यांनी सांगितले.

लायन्स क्लब मांडवाच्या लायन्स किहीम फेस्टिव्हलचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २२) प्रांतपाल अमरचंद शर्मा यांच्या हस्ते किहीमच्या राजा शिवछत्रपती क्रीडांगणावर करण्यात आले. या वेळी द्वितीय उपप्रांतपाल संजीव सूर्यवंशी, लायन्स हेल्थ फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल जाधव, उपाध्यक्ष नितीन अधिकारी, खजिनदार अरविंद घरत, लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष अभिजीत गुरव, उपाध्यक्ष जितेंद्र ठाकूर, सचिव प्रिती पाटील, खजिनदार सतीश म्हात्रे, मायक्रो कॅबिनेटचे प्रवीण सरनाईक, नयन कवळे, झोन चेअरपर्सन विद्या अधिकारी, रिजन चेअरपर्सन प्रियदर्शनी पाटील, किहीम ग्रामपंचायत सरपंच प्रसाद गायकवाड, उपसरपंच मिलिंद पडवळ, लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष प्रमोद राऊत, प्रदीप सिनकर, अलिबागचे प्रदीप नाईक, अमिष शिरगावकर, सुबोध राऊत, मोहन पाटील, सुमित पाटील, डॉ. राजाराम हुलवान, चंद्रकांत मल्हार, अजय आंगणे, लिओ क्लब अध्यक्ष अजिंक्य अधिकारी आदी उपस्थित होते.

समारंभात साहित्य व पत्रकारिता क्षेत्रात भूषणावह काम केल्याबद्दल उमाजी केळुसकर, क्रीडा क्षेत्रात सिद्धी नाखवा, सामाजिक क्षेत्रात चमकदार काम केल्याबद्दल तपस्वी गोंधळी, चित्रकला क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल चंद्रकला कदम यांचा सत्कार करण्यात आला.

जयेश पाटील यांच्या नृत्यपथकातील कलाकारांनी आपल्या नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. फेस्टिव्हल अध्यक्ष धवल राऊत यांनी प्रस्ताविक केले. सूत्रसंचालन विवेक तेंडुलकर, सुमित पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन नितीन अधिकारी यांनी मानले. उद्घाटन समारंभानंतर खुल्या समूह नृत्य स्पर्धा झाल्या. या फेस्टिवलमध्ये विविध प्रकारचे १३० स्टॉल्स असून डॉ. राजाराम हुलवान यांच्या माणुसकी प्रतिष्ठानचे आरोग्य पथक येथे आरोग्य सेवेसाठी सज्ज आहे. फेस्टिव्हलचा समारोप २५ डिसेंबर रोजी होणार आहे.



# गोखले महाविद्यालयास नॅकचे 'ब' मानांकन

**श्रीवर्धन** : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास बंगलोर येथील नॅक अर्थात राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन समितीने भेट दिली. समितीने २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या कामकाजाचे सूक्ष्मपणे मूल्यमापन केले, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व पालक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांच्याशी संवाद साधून अपेक्षा, अडचणी व वस्तूस्थिती समजावून घेऊन गोखले महाविद्यालयास नॅकचे मबफ मानांकन देण्यात आले.

प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी, डॉ.वाल्मिक जोंधळे, डॉ. निलेश चव्हाण, डॉ. कल्याणी नाझरे, प्रा.पंकज गमे,प्रा. सागर कुंभार, उपप्राचार्य किशोर लहारे, डॉ. योगेश लोखंडे, प्रा. संतोष लंकेश्वर, डॉ. विलास व्हनकट्टे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्माचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे ऊसली बुदुक ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - उसर्ली बुदुक, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| उसर्ली बुदुक | महादेव कुंडलीक पाटील | ३७ | ४ | ०-१०-०० | ०.१९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

**तारीख:-२३/१२/२०२३**
**ठिकाण :- पनवेल**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता. पनवेल, जि. रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल सुरज रोहिदास भोईर रा. साई अमृत पॅराडाईज, फ्लॅट नं. सी-२०२, प्लॉट नं.४३, सेक्टर-०२, करंजाडे, ता पनवेल, रायगड-४१०२०६ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे-वडवली, ता. कर्जत, जि.रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| दिनेश गुरूनाथ कडव | ५ | १/ग | ०.५१.०० पैकी ०.२०.०० गुंठे | ०.६१ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येण-या तकारी/ हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

**तारीख:-२४/१२/२०२३**

**सही/-**
**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता-प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत,
जि.रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## निवडक

### मोरे महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम



**रोहे** : एम. बी. मोरे महाविद्यालय धाटाव येथे १८ ते २० डिसेंबरदरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समिती आणि विद्यार्थिनी प्रतिनिधींनी ट्रॅडिशनल डे, अंताक्षरी, ऑन दि स्पॉट डान्स, मजेदार खेळ, बॉलिवूड डे, साँग डेडिकेशन, फिशपाँड आदी मजेदार स्पर्धा आणि कार्यक्रमाचे नियोजन केले होते. सांस्कृतिक समितीचे प्रमुख प्रा. सुरभी ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन पार पडले. एम. बी. मोरे शिक्षण संकुलात वार्षिक क्रीडा स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले. क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ गुरुवारी (दि. २१) झाला. क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन संस्थेचे संचालक अशोक मोरे आणि ग्रामपंचायत सदस्य रुपेश रटाटे यांच्या हस्ते झाले. क्रीडा समिती प्रा. नरेश घाग, प्रा. मयुर पाखर आणि स्कूलच्या शिक्षिका स्नेहल कसबले यांनी स्पर्धांचे नियोजन केले आहे.

### इनरव्हील क्लब खोपोलीचे कॅलेंडर



**खोपोली** : इनरव्हील संस्थेच्या मासिक सभेत संस्थेच्या वतीने कॅलेंडर प्रकाशन सोहळा अल्टा कंपनीचे मॅनेजर बाळासाहेब म्हात्रे यांच्या हस्ते झाला. क्लबला १० जानेवारी २०२४ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. आपण जे काम करतो ते समाजापर्यंत पोहचवण्यासाठी कॅलेंडरचा उपयोग करण्यात आला आहे. या प्रोजेक्टसाठी अल्टा कंपनीचे व गायत्री ज्वेलर्स यांचे सहकार्य लाभले. या वेळी अध्यक्ष श्रीदेवी राव, उपाध्यक्ष जयश्री कलोशी, कार्यवाह दीना शाह, खजिनदार मधुमिता पाटील, माजी अध्यक्ष मंजू वर्मा, इंदू पिल्लई, क्षमा आठवले, डॉ. रश्मी टिळक, सुलभा बीनीवाले, विनया हर्डीकर व इतर सदस्य उपस्थित होते. या उपक्रमाच्या प्रमुख रेवती गजेंद्र गडकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पतसंस्थांच्या इन्कम टॅक्सबाबत गृहमंत्री अमित शाहांशी चर्चा करणार

### खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन




**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

कोकणातील सहकार क्षेत्र गुणवत्तेत राज्यात अग्रेसर आहे. पतसंस्थांवर लागत असलेल्या इन्कम टॅक्सबाबत गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करणार असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले. माणगावच्या सह्याद्री ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित रोहा शाखेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

भाटे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी, पतसंस्थचे चेअरमन ॲड. राजीव साबळे, व्हाईस चेअरमन चंद्रशेखर देशमुख, राष्ट्रवादीचे सरचिटणीस विजय मोरे, शिवसेना तालुकाप्रमुख समिर शेडगे, ॲड. हेमंत गांगल, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, सुर्यकांत काळे, दिलीप शेठ, पप्पू साबळे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, सचिन शेडगे, शहरप्रमुख दीपक तेंडुलकर, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, सुभाष राजे आदी उपस्थित होते.

खासदार तटकरे पुढे म्हणाले की, माणगाव परिसरात सह्याद्री पतसंस्थेचे बीज रोवले गेले. ३३ वर्षांत उत्तम प्रतीचा कारभार पतसंस्थेने केले. राज्यभरात पतसंस्था संस्था आहेत. त्यामध्ये सह्याद्री पतसंस्था अग्रगण्य संस्था आहे. सहकार क्षेत्रामुळे राज्याच्या अर्थकारणाला बळ मिळाले. कोकणात सहकार क्षेत्रात संस्था कमी आहेत, परंतु कोकणातील सहकारी संस्था, बँक, पतसंस्था यांनी आपली दर्जा कायम ठेवला आहे.आमदार महेंद्र दळवी यांनी पतसंस्थांना सहकार्य करण्याचे भूमिका आमचे सहकारी घेतील, असे सांगत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ॲड. राजीव साबळे म्हणाले यांनी, रोहेकर आम्हाला पाठिंबा देतील अशा अपेक्षा आज मी करीत आहे. ३३ वर्षांची परंपरा आमची आहे. चांगला कारभार आमच्या संस्थेचा असल्याचे सांगितले. गिरीश तुळपुळे यांनी म्हटले की, पतसंस्थाना लाईट बिलाची सुविधासाठी खासदार सुनील तटकरे यांनी प्रयत्न केले. पतसंस्थेवर प्रेम करणारे म्हणून त्यांची ओळख आहे. सहकारी संस्थेमुळे ग्रामीण अर्थकारण चांगले राहिले आहे, पण पतसंस्था सहकारी तत्त्वावर असतानाही त्यांना टॅक्स लागत आहे. खासदार सुनील तटकरे यांनी पतसंस्थांना लागणाऱ्या टॅक्सबाबत लक्ष घालावे, अशी मागणीही त्यांनी केली.

प्रास्ताविकात चंद्रशेखर देशमुख यांनी, सामाजिक कार्य करण्याचा मानस धरून पतसंस्था साकारण्याचा १९८९च्या सुमारास प्रयत्न केले. १९९० साली संस्था स्थापनेला परवानगी मिळाली. हळूहळू पतसंस्थेची प्रगती होत आहे. खासदार सुनील तटकरे यांच्यामुळे लाईट बिलाची सुविधा पतसंस्थेला मिळाली, असे सांगून रोह्यात शाखा होत असताना नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## आनंदमेळा व रोहा फेस्टिवल

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ रोहा व सॅटॅलाइट रोटरी क्लब ऑफ नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमानाने ३० व ३१ डिसेंबर रोजी रोहा येथील नदी संवर्धन ग्राउंड पार्किंग येथे भव्य आनंदमेळा व रोहा फेस्टिवल फन फेअरचे आयोजन करण्यात आले आहे.

या ठिकाणी ३० डिसेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता फॅशन शो होणार आहे. यामध्ये मिस रोहा, मिस्टर रोहा, स्मार्ट बॉय, स्मार्ट गर्ल, क्वीन ऑफ रायगड, विवाहित महिलांनाही संधी आहे. प्रत्येक गटातलि विजेत्याला आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांसाठी फनी गेम आहेत. लोकांना खरेदी करण्यासाठी व खवय्यांसाठी विविध प्रकारचे स्टॉल ठेवलेले आहेत. होम मिनिस्टरच्या धर्तीवर महिलांना पैठणी जिंकण्याची संधी आहे. प्रत्येक कुपनवर लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षीस मिळेल.

## रेवदंडा ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत विविध विषयांवर विचारविनिमय

### पूर्णवेळ ग्रामसेवक नेमणुकीची मागणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा ग्रामपंचायतीची ग्रामसभा नुकतीच पै. बच्चुभाई मुकादम सभागृहात झाली. या वेळी विविध विषयांवर चर्चा झाली. मागील सत्ताधाऱ्यांच्या विविध कामांवर या वेळी आक्षेप घेण्यात आला तसेच ग्रामपंचायतीसाठी पूर्णवेळ ग्रामसेवकाची नेमणूक करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

रेवदंडा ग्रामपंचायतीची ग्रामसभा नवनिर्वाचित सरपंच प्रफुल्ल मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या ग्रामसभेस ग्रामसेवक दिवकर, उपसरपंच मंदा बळी, सदस्य सुराराम माळी, संतोष मोरे, आशा कमळनाखवा, खलिल तांडेल, दिक्षा बळी, पं.स. सांडपाणी समन्वय अधिकारी ईच्छा नाईक, मुख्य लेखनिक सुभाष मानकर, हेमंत गणपत तसेच माणिक बळी, ज्ञानेश्वर टिवळेकर, ताराचंद कोंडे, मुज्ञफर मुकादम, हर्षल घरत, योगेश पिटनाईक, आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थिती होते. प्रारंभी सरपंच प्रफुल्ल मोरे यांचा सन्मान मुज्ञफर मुकादम यांनी केला. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते हेमंत गणपत यांनी ग्रामसेवकाच्या उपस्थितीबाबत प्रश्न ग्रामसेवक दिवकर यांना उपस्थित केला व रेवदंडा ग्रामपंचायतीसाठी पूर्णवेळ ग्रामसेवकाची नेमणूक व्हावी, अशी मागणी केली. मुख्य लेखनिक सुभाष मानकर यांनी इतिवृत्ताचे वाचन सुरू केले. या वेळी विविध कामांवर सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतला.

पं. स. सांडपाणी समन्वय अधिकारी ईच्छा नाईक यांनी सांडपाण्यासंदर्भात मार्गदर्शन उपस्थित ग्रामस्थांना केले. या वेळी ग्रामस्थांनी सांडपाणी, रस्ते, आदी कामांविषयी तक्रारी मांडल्या. मागील काळात रखडलेल्या समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले.

## मुरुडमध्ये दिव्यांगांसाठी शिबिर


**मुरुड : प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को) दिव्यांगांसाठी कृत्रिम व सहाय्यक उपकरणे यांच्या वाटपासाठी मुरूडमध्ये शिबिर घेण्यात आले. पंचायत समितीमध्ये झालेल्या या शिबिरात ३२३ दिव्यांगांनी सहभाग नोंदविला.

या वेळी प्रमुख पाहुणे माजी जि. प. सदस्य सुबोध महाडिक, तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष फैरोज घलटे, सचिव विजय पैर, पं. स. गटविकास अधिकारी गजानन लेंडी, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, विस्तार अधिकारी सुभाष वाणी, माजी सभापती स्मिता खेडेकर, सहाय्यक गटविकास अधिकारी आत्मज मोरे, नायब तहसीलदार राजेश्री साळवी, विजय म्हापुसकर, डॉ. नेहांश मेहता, दिव्यांग तालुकाध्यक्ष भारत भोईर, आशिष मुकणे, प्रदीप गायकवाड, आगरदांडा सरपंच आशिष हेदुळकर, माजी सभापती आशिका ठाकूर, राजपुरी सरपंच सुप्रिया गिदी, उपसरपंच इस्माईल सिद्दिक, डॉ. संकेत डेरवणकर, डॉ.राम कुमार सिंग, मनीष कुमार, अभिषेक दिवेदी, कृषी विस्तार अधिकारी वसंत दळवी आदी उपस्थित होते.

माजी जि. प. सदस्य सुबोध महाडिक यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास फैरोज घलटे यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. कृषी विस्तार अधिकारी वसंत दळवी म्हणाले की, या शिबिरात कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनाची उपलब्धता, सल्ला व मार्गदर्शन व विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.

माजी सभापती स्मिता खेडेकर, जिल्हा उपाध्यक्ष सोशल मीडियाचे हसमुख जैन यांनीही मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका गुंजाळ यांनी केले.



## पालीवाला महाविद्यालयाचे विशेष निवासी शिबिर उत्साहात



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष निवासी शिबिर भार्जे येथे १६ ते २२ डिसेंबरदरम्यान उत्साहात झाले.

शिबिरात ग्रामस्वच्छता, प्लास्टिकमुक्त गाव, वनराई बंधारा आणि ग्राम सुशोभीकरण आदी उपक्रम राबविण्यात आले. मार्गदर्शनपर बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यात व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, शासकीय योजनांच्या संदर्भातील जाणीव जागृती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि ग्रामीण सक्षमीकरण आदी विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कृषी अधिकारी तसेच आर्ट ऑफ लिविंगचे टीचर अशोक महामुनी यांच्या सहकार्यातून विनामूल्य योग प्रशिक्षण देण्यात आले.

शिबिरासाठी सरपंच चिंतामण सुतार, उपसरपंच सुभाष कोंडे, सदस्य, शाळा प्रशासनाचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग, एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. स्नेहल बेलवलकर, प्रा. ज्ञानेश्वर मुंढे, डॉ. अनिल झेंडे, विद्यार्थी प्रतिनिधी साक्षी तांबोळी, दर्शन दंत, राकेश शिद व सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## केएमसी महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील केएमसी महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी प्रोफेशनल अकाउंटंट या पदासाठी करियरविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. जवळपास ८० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि त्यांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेतली.

महाविद्यालयातील कॉमर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या प्रारंभी कॉमर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. विनायक गांदल यांनी पारंपरिक विषय ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना आधुनिक युगात नोकरी प्राप्त करण्यासाठी व्यावसायिक आणि कार्पोरेट कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

या वेळी पुणे येथील आर. डी. इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल अकाउंटंट ॲण्ड टॅक्सेशन या संस्थेचे संचालक सीए राजेंद्र डांगी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्पोरेट उद्योगधंद्यांमध्ये प्रोफेशनल अकाउंटंटना मोठ्या प्रमाणामध्ये मागणी आहे, परंतु यासाठी आवश्यक असणारी विविध कौशल्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातच आत्मसात करणे आवश्यक आहे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

आपल्या मनोगतामध्ये वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विनायक गांदल यांनी विद्यार्थ्यांना वाणिज्य शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण पूर्ण करून आपण चांगले करिअर घडू शकतो, असे सुचविले उपस्थितांचे आभार प्रा. श्रद्धा पडवळ यांनी मानले.



## खोपोलीत गीता जयंतीनिमित्त नागरिकांनी केले भगवद्गीतेचे पठण





**खोपोली : प्रतिनिधी**

मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला गीता जयंती साजरी केली जाते. या दिवशी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला युद्धादरम्यान उपदेश केला असे मानले जाते. त्यानिमित्ताने खोपोली ब्राह्मण सभेच्या वतीने ब्राह्मण सभा सभागृहात भगवद्गीता पठणाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. खोपोलीतील शेकडो नागरिक या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते.

चिन्मय मिशन खोपोलीचे आचार्य स्वामी मेधजानंद यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. या उपक्रमावेळी ॲड. मीना बाम, अच्युत धर्माधिकारी, संस्कृतच्या अभ्यासिका उज्वला भावे, संस्थेचे अध्यक्ष अनिल रानडे, सहकार्यवाह राजेंद्र पेठे, खजिनदार सुधाकर भट, उपाध्यक्ष सुनीता पाटणकर, अनिशा बिवरे, वृषाली बेलसरे, अविनाश पाटणकर, सरला पाटील यांच्यासह खोपोलीच्या विविध भागांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेरळमध्ये आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ ग्रामपंचायत आणि कर्जत प्रेस क्लबच्या वतीने आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान दादर मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने नेरळमध्ये मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १९१ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.



मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन नेरळमधील आंबमाता सभागृहात करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सरपंच उषा पारधी यांच्या झाले. या वेळी ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य प्रथमेश मोरे, श्रद्धा कराळे, रायगड प्रेस क्लबचे खजिनदार दर्वेश पालकर आदी उपस्थित होते.

कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष ॲड. राहुल देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, डॉ. उन्नती पित्रोडा यांच्यासह १५ डॉक्टर आणि १० आरोग्यसेवकांनी सेवा दिली. पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्ण यांची चिकित्सा करण्यात आली. बहिरेपणा, सांधेदुखी, कंबरदुखी, गुढघेदुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली, तर डॉ. ज्योती वाघमारे, डॉ. ध्रुव दमानिया, डॉ. हर्षदा चव्हाण, डॉ. ऋतुजा शेळके, थेरेफिस्ट श्रुती सोनवणे, प्रीती मिंदे, यांनी रुग्णांच्या चामखीळ आणि भोवऱ्या तत्काळ काढल्या.

सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटनेच्या माध्यमातून औषधे मोफत देण्यात आली. सूत्रसंचालन व आभार दीपक पाटील यांनी केले.



# कुपवाडा महिला क्रिकेट संघ अलिबागमध्ये

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय लष्कराचे कुपवाडा वॉरियर्स आणि असीम फाउंडेशनच्या माध्यमातून काश्मीर खोऱ्यातील कुपवाडा येथील महिला क्रिकेट संघ कोकणच्या दौऱ्यावर आला आहे. या संघाने शुक्रवारी (दि. २२) अलिबाग येथे भेट दिली.

भारतीय लष्कराकडून आम्हाला चांगले सहकार्य मिळत आहे. आमच्याकडे क्रिकेट खेळासाठी सुविधा कमी असल्याने तरी भारतीय महिला क्रिकेट संघात स्थान मिळवायचे आहे, असा निर्धार या संघातील तरुणींनी व्यक्त केला आहे.

कुपवाडा हा उत्तर काश्मीरमधील नियंत्रण रेषेला लागून असलेला जिल्हा आहे. हा परिसर भूतकाळात राष्ट्रविरोधी कारवायांसाठी वापरला गेला, तरुणांना भडकावून हिंसाचाराला खतपाणी घातले गेले. एकेकाळी शेती आणि व्यापाराने भरभराट करणारा हा भाग १९९०च्या दशकात इतिहासातील एका गडद काळाचा साक्षीदार होता. आता हा प्रदेश रचनात्मक विकासाच्या मार्गावर पुढे सरकू लागला आहे.

कुपवाडा महिला क्रिकेट संघाची नायिका जमिला सुभान हिने या वेळी सांगितले की, महाराष्ट्रात क्रिकेट खेळासाठी चांगल्या सुविधा आहेत. काश्मीरमध्ये आणखी सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. भारतीय लष्कराचे आम्हाला चांगले सहकार्य मिळत आहे. क्रिकेट हा पुरुषांचा खेळ मानला जात असला तरी महिलाही यात कमी नाही. क्रिकेटबद्दल आमच्यात प्रचंड जिद्द आहे. आम्हाला भारतीय महिला क्रिकेट संघात स्थान मिळवून जगात आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करायचे आहे. या महिला संघाबरोबर असीम फाउंडेशनचे तुषार माडिवाले हेही उपस्थित होते.

# उदय देवरे 'आमदार श्री २०२३'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड बॉडी बिल्डर्स अ‍ॅण्ड फिटनेस असोसिएशन, पनवेल रोटरी क्लब इंडस्ट्रीयल टाऊन आणि फिटनेस पॉईंट जीम यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार श्री २०२३ या शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी (दि.२२) पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक उदय देवरे, द्वितीय महेश भिंगारकर आणि तृतीय क्रमांक मयूर भिंगारकर याने पटकाविला.



स्पर्धेचे उद्घाटन किसन पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेविका राजश्री वावेकर, माजी नगरसेवक समीर ठाकूर, आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डिंग चॅम्पियनशिप गोल्ड मेडलिस्ट सुभाष पुजारी, वूमन मिस युनिव्हर्स गोल्ड मेडलिस्ट गौरी वरणकर, दिनेश शेळके, डॉ. जय भंडारकर, रुघदेव कांडपिळे, निलेश काळे, मिलिंद तारी, संजय घोंगडे, स्वप्नील पवार, नरशी पटेल, महेंद्र आवटे, कृष्णा गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# द. आफ्रिकेच्या डीन एल्गरची कसोटीतून निवृत्ती

**केपटाऊन : वृत्तसंस्था**



दक्षिण आफ्रिकेचा माजी कसोटी कर्णधार डीन एल्गरने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. तो भारताविरुद्ध कारकिर्दीतील शेवटचा कसोटी सामना खेळणार आहे.

एल्गरची आतापर्यंतची कारकीर्द चमकदार राहिली आहे. सुमारे १२ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत त्याने ८४ सामने खेळले. या कालावधीत १३ शतके आणि २३ अर्धशतके झळकावली आहेत.

# नवी मुंबईत उद्यापासून आंतरराष्ट्रीय महिला टेनिस चॅम्पियनशिप

## १७ देशांतील ६१ खेळाडू होणार सहभागी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने येत्या सोमवार (दि.२५)पासून आंतरराष्ट्रीय महिला टेनिस स्पर्धा सुरू होत आहे. या स्पर्धेत एकूण १७ देशांतील ६१ महिला टेनिसपटू सहभागी होणार आहेत.

या वर्षी विजेत्यांना २५,००० हजार डॉलर ऐवजी ४०,००० डॉलरची रक्कम देण्यात येणार आहे. रक्कम वाढवली गेल्यामुळे आंतरराष्ट्रीय टेनिस विश्वात १८८ रँकिंग असलेली इकरीना मायक्रोवा (रशिया) आणि १९६ रँकिंग असलेली जपानची टेनिसपटू मोयुका उचीजीमा या नामवंत खेळाडूही या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेत खेळलेल्या मुलींना ऑस्ट्रेलियामध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते होणार असून पारितोषिक वितरण कार्यक्रमासाठी आमदार मंदाताई म्हात्रे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आयटीएफ स्पर्धेचे संचालक डॉ. दिलीप राणे यांनी दिली.

# राष्ट्रीय महिला कबड्डी स्पर्धेत सिद्धी नाखवाला 'कांस्य'

**अलिबाग : प्रतिनिधी**



पंजाब रूपनगर येथे झालेल्या ७०व्या वरिष्ठ गट महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र महिला कबड्डी संघात निवड झालेली दिलखूश आवास (अलिबाग) संघाची कबड्डीपटू सिद्धी शैलेश नाखवा हिने कांस्यपदक जिंकले. यासह तिने आवाससह महाराष्ट्र महिला कबड्डी संघाचे नाव उंचावले आहे.

या यशाबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधींसह दिलखूश क्रीडा मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, संघाचे परीक्षक संदेश वर्तक, व्यवस्थापक अभिजित गुरव तसेच ग्रामस्थांसह तालुक्यातील मान्यवरांकडून सिद्धीचे अभिनंदन होत आहे.

# रायगडच्या साईराज जोशीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडचा खेळाडू साईराज जोशी याची विजय मर्चंट क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्रच्या १६ वर्षांखालील मुलांच्या संघात निवड करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे साईराज जोशी याची १६ वर्षांखालील मुलांच्या संघात निवड करण्यात आली होती. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र आमंत्रितांच्या स्पर्धेत रायगड संघाकडून खेळताना आठ सामन्यांत साईराजने ३८ बळी घेतले. या चमकदार कामगिरीमुळे त्याची महाराष्ट्राच्या संघात निवड करण्यात आली.



साईराज हा डाव्या हाताने मध्यम जलदगती गोलंदाजी करतो. त्याला राजेंद्र कोंढाळकर यांच्याकडून प्रशिक्षण मिळाले आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते आणि सर्व सदस्यांनी कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल साईराज जोशी याचे परिसरात अभिनंदन होत आहे.






# कुणाल पिंगळेचे जन्मगावी जोरदार स्वागत



(छाया : जयवंत माडपे)

## आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी

**खोपोली : प्रतिनिधी**

मलेशिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करीत खालापुरातील कुणाल पिंगळे याने सुवर्णपदक पटकाविले. याबद्दल कुणालचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

दरम्यान, कुणाल परदेशाहून आपल्या जन्म गावी कांडरोली (खालापूर) येथे परतला तेव्हा ग्रामस्थांनी त्याचे ढोल ताशाच्या गजरात तसेच प्रशिक्षक विनायक पाटील यांचेही पुष्पहार घालून मिरवणूक काढत स्वागत केले.

कुणाल हा श्रीराम नगर येथील स्पार्टन फिटनेसमध्ये कोच म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. यापूर्वीही कुणालनेही प्रशिक्षक विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पदके पटकाविली आहेत.

यापुढे आपण आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी याहून चांगली कामगिरी करणार असल्याचे कुणाल पिंगळे याने सांगितले.


वर्ष ४० वे ॥ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥ स्थापना १९८२

मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह

श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ गिरीमल्लेश्वर महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥ श्री. स.स. प्रभिचैतन्य महाराज की जय ॥
गुरु चरणी ठेविता भाव । आपोआप भेटे देव ॥




अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर. यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरु चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४५, रविवार दि.२४/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पौर्णिमा शके १९४५, दत्तजयंती मंगळवार दि.२६/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागतील गुरुबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

नित्याचे कार्यक्रम

| सकाळी | सकाळी | सकाळी | सकाळी | दुपारी | दुपारी | सायंकाळी | सायंकाळी | रात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ ते ०६ | ०६ ते ०९ | ०९ ते १० | १० ते १२ | १२ ते ०१ | ०२ ते ०६ | ०६ ते ०७ | ०७ ते ०८ | ०९ ते ११ |
| काकड आरती | श्रींची नित्यपुजा | संगित भजन | प्रवचन | दुपारची आरती | संगित भजन | संध्याकाळची आरती | ग्रंथ वाचन व ध्यान | भजन व किर्तन |

दैनंदिन कार्यक्रम

रविवार दिनांक २४/१२/२०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० वा. संगीत भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावे खाडी (उत्तरपाडा) बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, पखवाज : आत्माराम मोकल |
| सकाळी १० ते ११ वा. प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब (पुणे), ह.भ.प. आप्पा पांचाळ (चिपळूण), श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर. |
| दुपारी २ ते ४ वा. भजन | भावभक्ती महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर गायिका : सौ. रत्नप्रभा घरत, श्रीमती हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत, सौ. आनंदी घरत. श्री. गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर गायिका : सुप्रिया घरत, पखवाज : तुषार घरत (चिर्ले, उरण) |
| दुपारी ४ ते ५ वा. भजन | संत जनाबाई प्रासादिक भजन मंडळ गायिका : सौ. पुनम ठाकूर, सौ. रुपम वास्कर, हर्षद फडके, पखवाज : श्री. पवन फडके. |
| सायं. ८ ते ९ वा. भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर बुवा : वसंतशेठ पाटील, नितीन ठाकूर (खारकोपर) पखवाज : श्री. गौरव म्हात्रे, तुकाराम कोळी (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ वा. किर्तन | श्री. हभप अनंत पांचाळ महाराज (आळंदी-खारकोपर) मृदूंगचार्य सिद्धार्थ म्हात्रे, साथकरी : श्री. कृष्णा दिंडी मंडळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग |

सोमवार दिनांक २५/१२/२०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० वा. संगित भजन | श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा) तबला : रुतुजा कानडा |
| स. १० ते १२ वा. प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब (पुणे) ह.भ.प. आप्पा पांचाळ (चिपळूण) |
| दुपारी २ ते ४ वा. | श्री. विश्वंभर भजन मंडळ (गव्हाण), गायक : हेमंत कोळी, पखवाज : प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ६ वा. | विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ, कोपर गायिका : सौ. अनुसया घरत, सौ. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील, सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर, वादक : दिनेश घरत. |
| रात्री ८ ते ९ वा. संगीत भजन | एकादशी भजन मंडळ, न्हावे बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ किर्तन | श्री. हभप पुरुषोत्तम महाराज (रोहा, धाटाव) |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर भजन रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर (न्हावाखाडी), पांडुरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर. |

मंगळवार दिनांक २६/१२/२०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० वा. संगीत भजन | नादब्रह्म साधना भजन मंडळ (रांजणपाडा, ओवेपेठ) देवसागर साधक समाज सामुदायिक संगित भजन बुवा : निवृत्ती चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, सुरेश ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), भाऊ ठाकूर (शिवाजीनगर) |
| स. १० ते १२ वा. प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री. बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

- व्यवस्थापक -

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय), शिवाजीनगर - गव्हाण-खारकोपर न्हावे - न्हावेखाडी - (संचलित)

- संयोजक -

श्री. रामशेठ ठाकूर (मा. खासदार, रायगड), ठाकूर परिवार आणि ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

कार्यक्रमाचे स्थळ : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर. मु. शिवाजीनगर. पो.गव्हाण. ता. पनवेल. जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल । कार्यक्रमाच्या वेळेला महत्व दिला जाईल.






सौजन्य : अमित जाधव (अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष), राजेश पाटील (पनवेल तालुका सोशल मीडिया अध्यक्ष)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com